फिडेल कॅस्ट्रो

सरला कारखानीस



आगामी।

केशवसुत । शांता ज. शेळके

हरि नारायण आपटे । शांता ज. शेळके

प्रेमचंद
मिर्झा गालीब } अनु. नारायण सुर्वे

राहुल सांकृत्यायन । सरला कारखानीस

डॉ. बाबासाहेब आंबेडकर । वीणा कऱ्हाडे

बालजीवनमाला
बालजीवनमाला
बालजीवनमाला
बालजीवनमाला
बालजीवनमाला
बालजीवनमाला
बालजीवनमाला
बालजीवनमाला
बालजीवनमाला
बालजीवनमाला
बालजीवनमाला
बालजीवनमाला

फिडेल कॅस्ट्रो

सरला कारखानीस

लोकवाङ्मय गृह लि.,

म / ३५३

मुखपृष्ठ / रचना
उदय शायकर

© सरला कारखानीस

प्रकाशक /
सुकुमार दामले
लोकवाङ्मय गृह लि.,
भूपेश गुप्ता भुवन,
८५, सयानी रोड,
प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.

मुद्रक /
प्रकाश विश्वासराव
न्यू एज प्रिंटिंग प्रेस,
भूपेश गुप्ता भुवन,
८५, सयानी रोड,
प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.

फिडेल कॅस्ट्रो

सरला कारखानीस

१. फिडेलचे बालपण व शिक्षण

क्यूबाचा फिडेल कॅस्ट्रो हा आजच्या जगातला अत्यंत मान्यवर क्रांतिकारक नेता आहे. तो इतका धाडसी व निर्भय आहे, आणि इतका लोकप्रिय आहे की त्याच्या नावाभोवती शेकडो कथा व दंतकथा निर्माण झाल्या आहेत.

फिडेल कॅस्ट्रोची ओळख करून घेताना आपण त्याच्या कुमारवयातील एक कथा ऐकू या.

त्यावेळी फिडेल १६ वर्षांचा होता आणि क्यूबाची राजधानी हवाना येथे माध्यमिक शाळेत शिकत होता.

एके दिवशी फिडेलचे दुसऱ्या एका मुलाबरोबर भांडण झाले. तो मुलगा फिडेलपेक्षा मोठा होता आणि अधिक ताकदवान होता. त्याने फिडेलला इतके मारले की आणखी मारामारी करण्याची ताकद फिडेलमध्ये राहिली नाही. दुसरे दिवशी फिडेलने त्याच्या 'शत्रू'ला शोधून काढले आणि दोघांची पुन्हा जुंपली. इतर विद्यार्थ्यांनी त्यांना एकमेकांपासून सोडवीपर्यंत ते मारामारी करीत होते. तिसऱ्या दिवशी फिडेल पुन्हा मारामारी करायला गेला आणि परिणाम काही फारसा निराळा झाला नाही. पण तो मोठा व ताकदवान मुलगा दमला. चौथ्या दिवशी काही तो फिडेलच्या पुढ्यात उभा राहिला नाही. फिडेलचा नैतिक विजय झाला.

असा हा फिडेल कॅस्ट्रो. पराभव त्याला माहीत नाही. कोणत्याही परिस्थितीला तोंड द्यायला तो खंबीरपणे उभा राहतो.

त्याचा जन्म क्यूबाच्या पूर्व टोकाच्या ओरियेन्त प्रांतातील बिरान गावाजवळच्या उसाच्या मळ्यात १३ ऑगस्ट १९२६ रोजी झाला.

लहानपणापासूनच तो बंडखोर स्वभावाचा. खरे तर त्याचा जन्म क्यूबातील एका श्रीमंत जमीनदार कुटुंबात झाला. त्याला आणखी सहा भावंडे होती. पण त्याचा धाकटा भाऊ राऊल कॅस्ट्रो हाच त्याचा चहाता झाला आणि पुढे फिडेलचा क्रांतिकारक मित्रही. त्याचे आई-वडील शिकलेले नव्हते. आणि त्यांच्या मुलांनी शिकावे असेही त्यांना वाटत नव्हते.

फिडेल ५–६ वर्षांचा झाला आणि वडिलांना म्हणाला, "मला शाळेत जायचं आहे." वडील म्हणाले, "नाही जायचं." फिडेल म्हणाला, "मला शाळेत घातलं नाहीत तर मी घराला आग लावीन!" त्याचा निर्धार पाहून वडिलांनी माघार घेतली आणि त्याला शाळेत जायला परवानगी दिली.

ओरियेन्त प्रांताची राजधानी सांत्यागो येथील एका मिशनरी शाळेत फिडेलचे नाव घालण्यात आले. सांत्यागो येथील फिडेलचे 'पालक' काही त्याला चांगले वागवीत नसत. त्याला पोटभर जेवायलादेखील मिळत नसे. पण तो शाळेत गेला आणि त्याने माध्यमिक शिक्षण पूर्ण केले.

त्याला आणखी शिकायचे होते. क्यूबाची राजधानी हवाना येथील उच्च माध्यमिक शाळेत त्याचे नाव दाखल करण्यात आले. ही सुद्धा मिशनरी शाळाच होती. त्यामुळे मुलावर धार्मिक संस्कार होऊन तो मवाळ बनेल अशी वडिलांची अपेक्षा! शाळेचे नाव 'कॉलेजिओ बेलेन.' ते १९४२ साल होते आणि फिडेल त्यावेळी १६ वर्षांचा होता.

या शाळेत तो शेती, इतिहास व स्पॅनिश भाषा शिकला. त्याला व्यायामाची व खेळांची खूप आवड होती. १९४४ मध्ये त्याची 'सर्वोत्कृष्ट शालेय खेळाडू' म्हणून निवड झाली. त्याची उत्कृष्ट आरोग्यसंपदा त्याच्या पुढील आयुष्यात त्याला अत्यंत उपयोगी पडली. १९४५ मध्ये तो शालान्त परीक्षा उत्तीर्ण झाला. त्याच्या प्रगतीबद्दल त्याच्या शिक्षकांनी शाळेच्या कागदपत्रात पुढील नोंद केली आहे :

" १९४२–१९४५. अभ्यासाच्या सर्व विषयांत फिडेल 'उत्तम' होता. त्याच्या कामाचा आलेख उत्कृष्ट आहे, तो खरा खेळाडू होता; शाळेच्या झेंड्याचे त्याने नेहमी शौर्याने व अभिमानाने रक्षण केले. सर्वांकडून कौतुक व जिव्हाळा कसा मिळवावा हे तो जाणत होता. त्याने वकिलीचा व्यवसाय करण्याचे ठरविले आहे. आणि त्याच्या जीवनाचे पुस्तक तो चमकदार पानांचे बनवील, याबद्दल आम्हाला मुळीच शंका नाही. तो कसदार आहे आणि उत्कृष्ट अभिनयपटूही."

शिक्षकांचे हे भविष्य फिडेलने शंभर टक्के खरे केले. अत्यंत चमकदार व तेजस्वी जीवन फिडेलने साकार केले.

त्या काळातील सगळ्या महत्त्वाकांक्षी तरुणांप्रमाणेच फिडेलनेही वकिलीचा व्यवसाय निवडला. कारण तो व्यवसाय स्वतंत्रपणे करता येतो.

कायद्याची पदवी मिळविण्यासाठी त्याने 'हवाना विश्वविद्यालया'त प्रवेश घेतला. त्यावेळी सर्व कॉलेजे बंडखोर व क्रांतिकारक विद्यार्थ्यांची केंद्रे झाली होती.

हे असे का हे समजावून घेण्यासाठी आपण क्यूबाची व तरुण फिडेलच्या काळातील क्यूबाच्या देश परिस्थितीची थोडी माहिती करुन घेऊ या.

२. तरुण फिडेलच्या काळातील क्यूबा

क्यूबा हे एक छोटेसे बेट आहे. ते उत्तर व दक्षिण अमेरिका खंडांच्या मध्यावर आहे आणि यू. एस. ए. (अमेरिकेच्या) किनाऱ्यापासून अवघ्या ९० मैलांवर आहे. मधल्या निमुळत्या सागरी मार्गाने पनामा कालव्यातील व दक्षिण अमेरिकेतील बहुतेक व्यापार चालतो. अमेरिकेच्या दृष्टीने ते अगदी मोक्याच्या जागी आहे.

क्यूबाची लोकसंख्या फक्त ७० लाख आहे—जवळजवळ आपल्या मुंबई शहराएवढी. प्रदेश अत्यंत सुंदर आहे. कोलंबसने अमेरिकेचा शोध लावला तेव्हा क्यूबाच्या भूमीवरही तो गेला होता. त्यावेळी त्याने " काय सुंदर प्रदेश ! याचे सौंदर्य पाहून डोळ्यांचे पारणे फिटते." असे उद्गार काढले.

क्यूबाला 'साखरेचे आगर' म्हणतात. तेथील ऊस अत्यंत कसदार असून त्यापासून उत्तम साखर मिळते. क्यूबात तयार होणारा तंबाखूही जगात प्रसिद्ध आहे. क्यूबातील निकेलचा व इतर खनिजांचा साठाही समृद्ध आहे.

४५० वर्षांपूर्वी या बेटावर रेड इंडियन्स लोकांची वस्ती होती. १४९२ मध्ये स्पेनने ते जिंकले. जवळ-जवळ एकतृतीयांश दक्षिण अमेरिका व संपूर्ण मेक्सिको स्पेनची वसाहत होती. ४०० वर्षे क्यूबावर स्पेनची सत्ता होती. इतर वसाहती स्वतंत्र होऊ लागल्या आणि क्यूबातही स्वातंत्र्यासाठी उठाव होऊ लागले.

कोणत्याही परकीय अंमलाप्रमाणेच स्पेनची सत्ताही क्रूर व जुलमी होती. मूळ वस्तीचे, सुमारे ४ लक्ष लोकांचे, या काळात जवळ जवळ निर्मूलनच झाले. स्थायिक झालेले स्पॅनिश, मळ्यात कामासाठी आणण्यात आलेले नीग्रो व त्यांच्यापासून निर्माण झालेली संमिश्र प्रजा हे आता क्यूबातील नागरिक आहेत.

क्यूबन देशभक्तांनी चळवळी सुरू केल्या. १८६८ च्या चळवळीला उग्र स्वरूप आले. १० वर्षे हा लढा चालला. त्यात ८० हजार स्पॅनिश सैनिक व ४ लाख क्यूबन लोक मारले गेले. अमेरिकेने स्पॅनिश सैन्याला भरपूर मदत केली आणि अखेर हा उठाव दडपला गेला.

१८७८-१८९८ हा काळ पुन्हा स्वातंत्र्यलढ्याच्या उठावाचा ठरला. खरे तर ही स्वातंत्र्ययुद्धे ३० वर्षे सतत चालूच होती. याच कालखंडात जोसे मार्टी हा क्यूबाचा महान नेता पुढे आला. तो ध्येयवादी होता. क्यूबन इतिहासातील जोसे मार्टी हे स्फूर्तिस्थान ठरले. त्याच्या लेखांनी, कवितांनी व वक्तृत्वाने लोकांची मने जिंकली. त्याचा निर्धार व आत्मसमर्पण वृत्ती यांनी क्यूबातील लोकांचे बळ वाढले. देशातील बुद्धिजीवी, लहान शेतकरी व मळेकामगार संघटित होऊ लागले. सार्वत्रिक संप, हरताळ, सशस्त्र लढा या सर्व मार्गांचा अवलंब लढवय्ये करू लागले आणि स्पेनची सत्ता हादरली. १८९५ च्या संमध्ये जोसे मार्टी लढता लढता मरण पावला आणि जनतेचा क्षोभ अधिकच वाढला. स्पेनची अखेर जवळ आली आणि अमेरिकेने १८९८ मध्ये आरमार व सैनिक घुसवून आपणच स्पेनचा पराभव केला असा देखावा निर्माण केला. अमेरिकेने क्यूबन लोकांना विश्वासात न घेता स्पेनबरोबर पॅरिस येथे तह केला. स्पेनने सत्ता सोडली आणि अमेरिकेने घटना वगैरे करून स्वतःचे वर्चस्व प्रस्थापित करण्याची सिद्धता केली.

आता अध्यक्षांच्या निवडणुका होऊ लागल्या; पण ते सर्व अमेरिकेच्या मुठीतले. त्यांच्या शोषणाला हातभार लावणारे. ४० वर्षांच्या काळात, हळूहळू अमेरिकेने सर्व आर्थिक केंद्रे ताब्यात घेतली. भांडवलदारांनी सुपीक जमिनी स्वस्तात घेतल्या आणि उसाचे, कॉफीचे, तंबाखूचे प्रचंड मळे उभारले. टेलिफोन व वीजपुरवठ्याच्या

उद्योगात ९० टक्के हिस्सा त्यांनी मिळविला, रेल्वेत ५० टक्के क्यूबन श्रीमंतांचा लहानसा भाग सोडला तर संपूर्ण राष्ट्र गरीब झाले, गुलाम झाले. भ्रष्टाचार फार बोकाळला आणि पैसे जमा करून परदेशातील बँकांत साठविण्याचा पैसेवाल्यांचा हव्यास वाढत गेला.

नवे उद्योगधंदे निघेनात. बेकारी वाढत चालली. दारिद्र्याला सीमा राहिली नाही. ६२ टक्के लोक झोपड्यांतून राहत होते, अर्धपोटी जगत होते. दूध त्यांना माहीत नव्हते. ते रोगग्रस्त होते, पण औषधपाण्याची सोय नव्हती. शिक्षणही त्यांना मिळत नव्हते.

लोकांची पर्वाच राज्यकर्त्यांना नव्हती. १९२४–२८ मध्ये अध्यक्षपदावर असलेला माचाडो केवळ लुटारू होता. तो अत्यंत क्रूर होता. अमेरिकन व क्यूबन श्रीमंतांचा त्याला पाठिंबा होता. तो दादागिरी करून दुसऱ्यांदा अध्यक्ष झाला आणि मुदत वाढवीतच राहिला. त्याने भाषण व लेखन-स्वातंत्र्यावर निर्बंध घातले आणि अत्याचार लपविण्याचा प्रयत्न चालविला.

याविरुद्ध विद्यार्थ्यांनी व कामगारांनी १९३१ मध्ये उठाव केला. तो चिरडण्यात आला. सगळ्या बंड-खोरांना ठार मारण्याचे सत्र सुरू झाले. पुन्हा उठाव झाला. प्रचंड सार्वत्रिक संप झाला. कामगारांनी कारखाने ताब्यात घ्यायला आरंभ केला. अखेर लष्करानेही माचाडोचा पाठिंबा काढून घेतला. कोट्यवधी डॉलर्स घेऊन माचाडो अमेरिकेला पळून गेला.

या धामधुमीत लष्करातील एक कनिष्ठ अधिकारी बातिस्टा हाती सत्ता घेऊन अध्यक्ष झाला. खूप पैसा मिळवून तो ४-५ वर्षांत निवृत्त झाला. काही काळ ऐषआराम करून तो १९५२ मध्ये निवडणुकांच्या रिंगणात

पुन्हा उतरला. त्याच निवडणुकीत फिडेलही उमेदवार होता. त्याचा विजय होण्याचा रंग दिसताच बाटिस्टाने निवडणुकाच घेतल्या नाहीत. लष्करावर ताबा मिळवून तो क्यूबाचा हुकूमशहा बनला.

त्याने सगळे राजकीय पक्ष बेकायदेशीर ठरविले. क्यूबाला लष्करी छावणीचे स्वरूप आले आणि लोकांमधील असंतोषामुळे तेथे क्रांतिकारक परिस्थिती निर्माण झाली.

त्यावेळी लॅटिन अमेरिकेतील अनेक देशांत लष्करशहांच्या राजवटी होत्या, आणि आर्थिक हितसंबंध गुंतलेले असल्यामुळे त्यांना अमेरिकेचा पाठिंबा होता. स्वाभाविकपणेच परस्परांना मदत करण्याची भावना सर्व देशांतील तरुणांत निर्माण झालेली होती.

हवाना विद्यापीठात फिडेलने १९४५ साली प्रवेश घेतला आणि दोन वर्षांत त्याच्याभोवती धाडसी तरुणांचा गट तयार झाला. डोमिनिकन रिपब्लिक हे मध्य अमेरिकेत, क्यूबाच्या जवळच व क्यूबापेक्षाही लहान असलेले बेट आहे. तेथील हुकूमशहाविरुद्ध तेथे जोरदार चळवळ चालू होती. काही डोमिनिकन व क्यूबन विद्यार्थी एकत्र आले आणि ओरिएंट प्रांताजवळच्या बे ऑफ नियेच्या बंदरातून जहाजात शस्त्रे घेऊन ते हल्ला चढवायला निघाले. ते भर समुद्रात असतानाच अमेरिकेच्या दबावामुळे क्यूबाच्या अध्यक्षाने आरमार पाठवून त्या तीन जहाजांचा पाठलाग केला. अटक होऊ नये म्हणून फिडेलने जहाजातून उडी टाकली आणि तो पोहत किनाऱ्यावर आला. हा दूरचा पल्ला पार करण्यासाठी त्याने बंदुकीचा उपयोग ओंडक्यासारखा करून घेतला असे म्हणतात.

क्यूबात करावयाच्या क्रांतीची ही जणू पूर्वतयारीच चालली होती. फिडेलचा आत्मविश्वास वाढत होता.

३. मोंकाडा लष्करी छावणीवरील हल्ला

फिडेल पदवीधर झाला आणि क्रांतीची व क्यूबन समाजात प्रत्यक्ष बदल घडवून आणण्याची तयारी करू लागला.

क्यूबातील परिस्थितीत लष्करी क्रांती हाच क्रांतीचा एकमेव मार्ग होता. बाटिस्टाच्या हुकूमशाहीविरुद्ध ठामपणे लढा देण्याचा निर्णय झाला.

फिडेल, साखरेच्या कारखान्यातील एक कर्मचारी एबेल सान्तामारिया व (अमेरिकन) जनरल मोटार्सच्या क्यूबातील कचेरीतील एक हिशोबनीस जेसो मोन्टार्नी यांची मते आणि मने जुळली. १६५ तरुण व २ तरुणी त्यांच्याभोवती कटात सामील होण्यासाठी जमले. सगळे तीस वर्षांहून लहान होते. बहुतेक सगळे पदवीधर होते. मोंकाडा या लष्करी छावणीवर हल्ला करण्याचा बेत ठरला. फिडेल त्यांचा पुढारी बनला.

तयारीसाठी एक वर्षाहून अधिक वेळ खर्ची पडला. गुप्त बैठका, गुप्तपणे शस्त्रास्त्रांची खरेदी व जमवा-जमव, थोडेफार लढाईचे शिक्षण, आणि हल्ल्याच्या योजनेची बांधणी. सगळेच अवघड. सगळेच नवीन. पैशाचा अभाव होताच. सर्वांनी आपल्याजवळ होते नव्हते ते सगळे एकत्र केले. सगळे नोकऱ्या सोडून आले होते. शस्त्रांची खरेदी गुप्तपणे होऊ लागली. या धामधुमीत फिडेलने एक जाहीरनामा तयार केला —'मोंकाडाच्या क्रांतिकारकांचे राष्ट्राला आवाहन.' त्यात त्याने जनतेला तिचे हक्क, देशाची आर्थिक उन्नती व उज्ज्वल भविष्यकाळ यासाठी क्रांतिकारक मंडळी आपले सर्वस्व अर्पण करतील, असे आश्वासन दिले.

सान्त्यागोच्या मुख्य छावण्यांवर व बायामोच्या उपछावणीवर २६ जुलै १९५३ ला हल्ला करण्यात आला. सर्व क्रांतिकारक व शस्त्रे सान्त्यागोच्या नजिकच्या कुक्कुटपालन केंद्रावर एकत्रित करण्यात आली. २७ जणांनी बायामोवर हल्ला चढवायचा होता. सान्त्यागो शहराच्या मध्यभागी मोंकाडा छावण्या पसरलेल्या होत्या. त्यांच्या प्रवेशद्वारावरील पहारेकऱ्यांची छावणी हस्तगत करून, नंतर सिव्हिल हॉस्पिटल ताब्यात घेऊन ' न्याय महाला 'त (पॅलेस ऑफ जस्टिस) घुसण्याचे ठरले. निरनिराळ्या तरुण नेत्यांच्या अधिपत्याखाली तुकड्या देण्यात आल्या.

सुरुवातच घातक झाली. प्रवेशद्वारावरच्या पहारेकऱ्यांना अचानक सुगावा लागला आणि त्यांनी धोक्याचा गजर केला. सगळ्या छावण्यांतील सैनिक या हल्लेखोरांवर तुटून पडले. अल्पकाळातच लढाईचा निकाल स्पष्ट झाला. फिडेलने माघार घेण्याचा आदेश दिला. फिडेलचे ३ बंडखोर ठार झाले. बाकीच्यांना शोधून शोधून काढण्यात आले आणि कैद करण्यात आले. त्या सर्वांचा अमानुषपणे छळ करण्यात आला. ६८ जणांना फाशी देण्यात आले. ३२ जणांना तुरुंगात डांबले गेले. १६७ शूरवीरांपैकी फक्त ५० पळून गेले. ते मात्र लष्कराच्या हाती सापडले नाहीत.

तुरुंगातील क्रौर्य आणि शिरच्छेद यांच्या बातम्यांनी सान्त्यागोचे लोक हादरून गेले. तुरुंगात अडकलेल्यांमध्ये फिडेलही होता. लोकांच्या दबावामुळे बाटिस्टाला दिसेल त्या क्रांतिकारकाला गोळी घालण्याचा हुकूम स्थगित करावा लागला. तरी पण ज्यांनी प्रतिकार केला त्यांना जागोजाग ठार मारण्यात आले.

३१ जुलैच्या रात्री फिडेल आणि त्याचे दोन सहकारी एका मित्राच्या शेतावरील घरात विलक्षण दमलेल्या अवस्थेत झोपले होते. ती बातमी लष्करी अधिकाऱ्यांना मिळाली आणि सैनिकांनी त्यांना पकडले. अधिकाऱ्यांपैकी एकाला कत्तलींचा व क्रौर्याचा अगदी वीट आला होता आणि केवळ त्याच्या मध्यस्थीमुळेच फिडेलवर गोळ्या घातल्या गेल्या नाहीत.

फिडेलला व त्याच्या काही मित्रांना जिल्हा तुरुंगात एकांतवासाच्या कोठडीत बंदिस्त करण्यात आलं. २१ सप्टेंबरला खटला सुरू झाला तेव्हा फिडेलने स्वतः आपली बाजू मांडण्याचे ठरविले. तो वकील झालेला होता म्हणून तो त्याचा हक्कच होता. हे समजताच नोकरशहा घाबरले. आणि " फिडेल आजारी आहे, " असे जाहीर करून त्यांनी फिडेलला खटल्यासाठी न्यायालयात उभं केलंच नाही.

नंतर त्याचा खटला गुप्तपणे चालविण्यात आला. तेथे न्यायाधीश व लष्करी अधिकारी यांखेरीज कोणी नव्हते. वृत्तपत्रांवर सर्व देशभर नियंत्रणच होते. यामुळे तेथे काय झाले ते बाहेर मुळीच कळले नाही. १६ ऑक्टोबरला फिडेलने आपले म्हणणे मांडले आणि सर्वांना ठणकावून सांगितले : "इतिहास मला निर्दोष ठरवील !" फिडेलचे हे भाषण नंतरच्या काळात क्यूबन जनतेचा राष्ट्रघोष झाला. जुलमी व अन्यायी सत्तेविरुद्ध लढण्याचा प्रत्येकाला अधिकार आहे, हे त्याने त्याच्या जबानीत स्पष्टपणे सांगितले. तुरुंगातील साडेतीन महिन्यांच्या एकांतवासात त्याने हे भाषण तयार केले होते. क्यूबाच्या क्रांतीत त्याला फार महत्त्वाचे स्थान आहे. या खटल्यात फिडेलला १५ वर्षांची शिक्षा ठोठावण्यात आली.

बोनिआटो तुरुंगातून त्याला ' आइल ऑफ पाईन्स ' (पाईन वृक्षांचे बेट) येथील तुरुंगात पाठविण्यात आलं. फिडेलच्या मित्रांना व नातेवाईकांना त्याच्याबद्दल काहीच माहिती मिळत नव्हती. हल्ल्यानंतरच्या कत्तलीत तो मारला गेला, अशा दाट वदंता उठल्या. पण त्याचे सहकारी म्हणत, " फिडेल जिवंत असलाच पाहिजे ! "

पुढे या तुरुंगातून त्याची पत्रे येऊ लागली. बहीण भेटायला जायची तेव्हा तिच्याबरोबर काड्यांच्या पेटीतून, कागदाच्या कपट्यावर, लिंबाच्या रसात लिहिलेले लेखन फिडेल पाठवू लागला. ते सर्व एकत्र करून ' इतिहास मला निर्दोष ठरवील 'चे हस्तलिखित तयार करण्यात आले. ' प्रचार सतत चालू ठेवा ' या फिडेलच्या आदेशा-

प्रमाणे त्याच्या मित्रांनी त्यातील बराचसा भाग लोकांपर्यंत पोहोचवला. अमेरिकन साम्राज्यवाद्यांची लूट व बातिस्ता सरकारचे क्रौर्य यावर त्यात स्पष्ट प्रकाश टाकण्यात आला. असून, क्रांतीनंतरचा क्यूबा कसा असेल याबद्दल अत्यंत व्यवहार्य व संयत आश्वासने देण्यात आलेली आहेत.

तुरुंगात असताना फिडेलने खूप वाचन केले; त्यात इतिहास व राजकारण याविषयीची पुस्तके प्रामुख्याने होती. त्याने मार्क्स व लेनिन यांचीही काही पुस्तके वाचली. क्रांतिविषयीची त्याची मते अधिक स्पष्ट होऊ लागली.

फिडेलला व इतर राजबंद्यांना मुक्त करावे, अशी मागणी क्यूबात वारंवार होऊ लागली. आणि संसदेतही तसा ठराव पास झाला. त्यामुळे अखेर त्यांना सोडून देणे बातिस्ताला भाग पडले.

१३ मे १९५५ रोजी जवळ जवळ २ वर्षे तुरुंगवासात घालवून फिडेल बाहेर आला. तेथील रहिवाशांनी त्याचे जोरदार स्वागत केले. हवानामध्येही त्याचे भव्य स्वागत झाले. फिडेल एक लढवय्या म्हणून लोकांना माहीत झाला होता.

मोंकाडावरील हल्ल्यात फिडेलचे जिवाभावाचे साथीदार मारले गेले, त्याचे त्याला दुःख होतेच; शिवाय हल्ल्याचा उद्देशही असफल झालेला होता. पण त्याचा लोकांवर राजकीय प्रभाव मोठा पडला. फिडेलही निराश नव्हता. त्याने जाहीर केले: "आता क्रांतीचा दुसरा टप्पा सुरू झाला आहे." फिडेलच्या व्यक्तित्वाची जादू अशी की मोंकाडा कटात भाग घेतलेल्यांपैकी जे जगले-वाचले ते परत फिडेलभोवती जमा झाले.

फिडेल पुन्हा जमवाजमव करू लागला. मित्रांबरोबर चर्चा करून त्याने आपल्या क्रांतिकारक गटाचे नाव निश्चित केले, '२६ जुलैची संघटना.'

४. 'ग्रॅन्मा'ची मोहीम

हवानात फिडेलला कोणत्याही प्रकारचा क्रांतिकारक प्रचार करता येईना. सभांपासून भाषणांपर्यंत व लेखनापासून शांततामय चळवळीपर्यंत सर्वांवर बंदी. अखेर लढ्याच्या तयारीसाठी परदेशात जाण्याचा त्याने निर्णय घेतला. तुरुंगातून सुटल्यानंतर दोन महिन्यांच्या आत, जुलै १९५५ मध्ये तो मेक्सिकोला गेला. क्यूबन क्रांतीबद्दल सहानुभूती असलेले अनेक तरुण दक्षिण व उत्तर अमेरिकेत होते. त्यांना मेक्सिकोत आणून गनिमी लढ्याचे शिक्षण द्यायचे, खुद्द क्यूबात 'सव्वीस जुलै संघटना' बांधायची आणि दोन्ही उठावांची सांगड घालून क्रांती घडवून आणायची, अशी योजना त्याने तयार केली.

मेक्सिकोत जमलेल्या कोणाही क्रांतिकारकांजवळ पैसे नव्हते. मेक्सिको सरकारही त्यांच्या विरुद्धच होते. त्यामुळे थोडी जमवाजमव होते न होते तोच सैनिकांची धाड यायची आणि पुन्हा श्रीगणेशाला सुरुवात करायला लागायची.

अखेर पैसे जमा करण्यासाठी तो अमेरिकेत गेला. तेथे तो सात आठवडे राहिला; न्यू यॉर्क, फिलाडेल्फिया व मियामी येथे सभा घेऊन त्याने काही हजार डॉलर्स जमा केले. दरम्यान १९५६ च्या ऑक्टोबरपर्यंत क्यूबातही '२६ जुलैच्या संघटकां'नी ८ हजार डॉलर्स जमा केले. क्रांतिकारकांचा उत्साह वाढला.

मेक्सिकोत फिडेलला त्याच्यासारखाच निधड्या छातीचा जिवाभावाचा एक मित्र मिळाला. तो म्हणजे अर्नेस्टो चे गव्हेरा. तो 'चे' या नावाने लोकप्रिय आहे. तो अर्जेंटिनात जन्मला. तरुणपणापासून तो क्रांतिकारक

वगैरे नव्हता; परंतु पक्का भटक्या होता. वैद्यकीय विद्यालयात शिकत असतानाच त्याची भ्रमंती चालू होती. दक्षिण अमेरिका त्याने जवळजवळ पायाखाली घातली. जंगले, नद्या, पर्वतमय प्रदेश हिंडत हिंडत, महारोगी व आदिवासींचे जीवन पाहत व त्यांच्यावर औषधोपचार करीत त्याने लोकांची परिस्थिती पाहिली आणि " हे असे का ? " या प्रश्नाने त्याला सतावले. त्यामुळे तो राजकारणाकडे अधिक चौकसपणे पाहू लागला.

फिडेलच्या मोंकाडावरील हल्ल्याच्या बातम्या तो सतत ऐकत होता आणि मेक्सिकोत येऊन त्याने फिडेलबरोबर विचारांची देवाणघेवाण केली. पुढील आयुष्यात तो स्वतःच एक मोठा प्रसिद्ध पुरुष बनला; पण फिडेलला मात्र तो फारच मान देत असे. तो त्याचा अगदी ' एकनिष्ठ ' अनुयायी बनला.

' चे 'चे व्यक्तिमत्त्व मोठे आकर्षक होते. खरे तर बालवयापासून तो दमेकरी होता. पण हा दमा सोबतीला घेऊन जीवनभर युद्धआघाडीवर चे सेनापती म्हणून तळपला.

वर उल्लेख केल्याप्रमाणे पैसे जमा होऊ लागताच क्रांतिकारक कामाला लागले. गनिमी शिक्षणासाठी आणि शस्त्रास्त्रे साठविण्यासाठी मेक्सिको शहराजवळच त्यांनी एक छोटासा मळा विकत घेतला. मिळतील त्या बंदुका, जुन्यापुराण्या मशिनगन्स मळ्यात जमू लागल्या. अमेरिकेतूनही गुप्तपणे शस्त्रे येऊ लागली. गनिमी युद्धतंत्रात निष्णात असलेल्या जनरल अल्बर्टो बायो या अधिकाऱ्याच्या हाताखाली गनिमी सैनिक शिक्षण घेऊ लागले.

पण कोणीतरी बातमी फोडली आणि मेक्सिकोच्या पोलिसांनी छावणीवर छापा घातला. बंडखोर जेमतेम जीव वाचवून पळाले, पण सर्व शस्त्रास्त्रे पोलिसांच्या ताब्यात गेली.

पुन्हा पैसे जमविणे, शस्त्रे जमविणे, शिक्षण घेणे चालू झाले. आता गुप्तताही अधिक कडक ठेवण्यात

आली. मैलच्या मैल चालणे, नद्या, डोंगर, पहाड पार करणं, आकाशाच्या छपराखाली झोपणं, कमीत कमी अन्नावर जगणे या गोष्टींचा सराव करण्यात आला. जोडीला जंगलातील सरपटणाऱ्या प्राण्यांचा उपद्रवही सहन करावा लागत होता. आता सर्व सैनिक एका छावणीत नव्हते; त्यांचे निरनिराळे तीन गट करून प्रशिक्षण चालू होतं.

या गडबडीतही फिडेल मासिकांसाठी व वर्तमानपत्रांसाठी लेख लिहून प्रचार करीतच होता. क्यूबाच्या स्वातंत्र्यासाठी, आर्थिक उन्नतीसाठी आणि क्यूबन लोकांची परिस्थिती सुधारण्यासाठी समाजवादी क्रांती आवश्यक आहे आणि ती आम्ही करणारच आहोत, असे तो सांगत होता.

क्रांतीची तयारी गुप्तपणे चालू होती; तरी देखील आम्ही सशस्त्र क्रांती करण्यासाठी समुद्रमार्गे क्यूबात प्रवेश करणार आहोत, असे फिडेल उघडपणे सांगत होता. असे करणे बरोबर नाही, अशी टीका करणाऱ्या सहकाऱ्यांना तो सांगे, "हा आमचा डावपेच आहे. शत्रूला गोंधळात टाकण्यासाठी... हे मानसशास्त्रीय शस्त्र आहे."

"क्रांती करू किंवा मरू" ही घोषणा अगदी प्रारंभापासून फिडेल देत होता; आताही त्याची तीच घोषणा होती.

तयारी तर झाली; पण योग्य असे मोठे जहाज मिळेना. अखेर एक जुनी, मोडतोड झालेली बोट फिडेलनं पाहिली. तिच्यासाठी ५०–६० हजार डॉलर्स बातिस्टाच्या एका विरोधकाकडून मिळविले. तो क्यूबाचा पूर्वीचा एक अध्यक्ष होता. खूप पैसे कमावून राहिला होता. बातिस्टाइतकाच तो भ्रष्ट होता. फिडेलला मदत दिली तर

बाटिस्टानंतर आपल्याला पुन्हा क्यूबात वर्चस्व मिळवता येईल असे त्याला वाटत होतं. पण फिडेल त्याला ओळखून होता. नाईलाजानं त्यानं त्याच्याजवळचे पैसे घेतले, पण क्रांतीनंतर त्याला कोणत्याच सवलती दिल्या नाहीत. पुढे तो लवकरच क्यूबा सोडून पळून गेला.

तेव्हा बोट मिळाली, पण पुन्हा एकदा विश्वासघात झाला. पोलीस मागावर आले, पण त्यांच्या हाती फारसे काही लागले नाही.

आता मात्र फिडेलने मुळीच वेळ न घालविण्याचा निर्णय घेतला. मेक्सिकोत विखुरलेल्या ' २६ जुलैच्या ' क्रांतिकारकांना त्याने एकत्र केले. तीस नोव्हेंबरला क्यूबाच्या किनाऱ्यावर उतरायचे ठरविले.

फिडेलने मिळविलेल्या बोटीचे नाव ' ग्रॅन्मा. ' खरी ती फक्त १२ माणसांना प्रवासाला योग्य होती. पण तिच्यात ८२ बंडखोर दाटीवाटीने बसले. अन्न, सैनिकी पोषाख, बंदुका व इतर शस्त्रे गुप्तपणे भरण्यात आली.

२५ नोव्हेंबर १९५६ रोजी हे चिमुकले जहाज हळू हळू गुप्तपणे मेक्सिकोच्या समुद्रात शिरले. समुद्रात तुफान वादळ होते. एकही दिवा न लावता बोट चालवायची होती. समुद्राच्या हेलकाव्यांनी व तडाख्याने ओकाऱ्या होऊन सगळे हैराण झाले. पाचसहा दिवसांनी ते सावरले आणि क्यूबाच्या किनाऱ्याची वाट पाहू लागले.

सहा दिवसात प्रवास संपेल असा फिडेलचा अंदाज होता. पूर्वीच्या योजनेप्रमाणे क्यूबात क्रांतिकारक उठाव झाला; पण तो बाटिस्टाच्या फौजेने दडपून टाकला. ' ग्रॅन्मा ' क्यूबाकडे येत असल्याच्या बातम्या शत्रूला आधीच मिळाल्या होत्या. त्यामुळे संपूर्ण किनाऱ्यावर पहारेकऱ्यांची गस्त होती. त्यातील एकाने ' ग्रॅन्मा 'ला पाहिले आणि बिनतारी संदेश पाठविला. एक लष्करी बोट तेथे येऊन हजर झाली आणि ' ग्रॅन्मा 'वर गोळीबार

सुरू झाला. पण तोपर्यंत सर्वजण खाली उतरलेले होते. दोन विमानांतून बॉंबवर्षावही करण्यात आला; पण दलदलीतील झाडीमुळे बंडखोर बचावले. परंतु 'ग्रॅन्मा'ची जागा माहीत असल्यामुळे बंडखोर कोठे असतील याचा पूर्ण अंदाज शत्रूला होताच.

तशाही अवस्थेत, थकून भागून गेलेले, उपाशी व आजारी असलेले ते क्रांतिकारक दलदलीतून पाय उचलीत आश्रय शोधीत निघाले. सिएरा मेस्त्राचा पहाडी प्रदेश जवळच होता. त्याच्या रोखाने ते वाट शोधीत निघाले. प्रवासाला निघाल्यापासून १० दिवसांनी अर्धमेल्या अवस्थेत ही 'फौज' थोड्या 'सुरक्षित' स्थळी पोहोचली. फिडेल क्रांती यशस्वी होत असल्याची स्वप्ने पाहतच होता. फिडेल, राऊल व त्याचे सर्व मित्र गोळीबारात ठार झाल्याच्या बातम्या हवानाच्या वृत्तपत्रांत प्रसिद्ध झाल्या आणि त्यांना खूप प्रसिद्धी मिळाली.

५. 'सिएरा मेस्त्रा'मधील युद्धतयारी

त्या ८२ धाडसी वीरांपैकी बहुतेक सर्वजण लपतछपत झाडीत घुसले आणि निपचीत पडून राहिले. दुपारी त्यांना जाग आली आणि आकाशात लष्करी विमाने घिरट्या घालीत असलेली त्यांनी पाहिली.

आपल्यावर कोणते संकट कोसळले आहे याची कल्पना येण्यापूर्वीच बॉंबगोळ्यांचा वर्षाव सुरू झाला. सगळे लोक मिळेल ते शस्त्र घेऊन सैरावैरा धावू लागले. आजूबाजूचा सर्व प्रदेश आगी लागून पेटून निघाला. बातिस्ताच्या फौजेने अनेकांना पकडले. अनेक जण ठार झाले. कोण कोठे गेला याचा पत्ता राहिला नाही. जंगलातून लपून छपून पुढे जात, उसावर भूक भागवीत, खडकावरचे पाणी चाटीत, ते सर्व जण १५-२० दिवस सिएरा मेस्त्राच्या दिशेने भटकत राहिले.

अखेरीस सिएरा मेस्त्राच्या एका उंच पहाडीत एक एक करीत, जिवंत राहिलेले क्रांतिकारक जमा झाले. फिडेल कॅस्ट्रो, चे गव्हेरा आणि इतर १० जण असे मिळून ते फक्त १२ होते आणि ६ बंदुका ! क्यूबाच्या विजयी क्रांतीच्या फिडेलच्या आकांक्षा अशा भयानक स्वरूपात त्याच्यासमोर साकार झाल्या ! धन्य तो नेता की ज्याने या परिस्थितीतही निग्रह व निर्धार कायम टिकवला.

सिएरा मेस्त्रा हा दक्षिण क्यूबातील ओरियेन्ते प्रांतातील ईशान्य किनाऱ्याजवळचा प्रचंड पहाडी विभाग. घनदाट जंगलांनी वेढलेले, क्यूबातील सर्वांत उंच डोंगर याच विभागात आहेत. या भागातील लोकवस्ती ५० हजार होती. ऊस, तंबाखू व कॉफी यांची या भागात लागवड होत असे. पण शेतकरी अत्यंत दरिद्री होते. तेथे धड रस्ते नव्हते; शाळा तर नव्हत्याच. दवाखाने व डॉक्टरही नव्हते. सरकारी कचेऱ्या किंवा अधिकारी नव्हते. एक बलाढ्य शेतकरी सर्व लोकांवर वर्चस्व गाजवून मनमानी कारभार करीत असे.

सिएरा मेस्त्रामधील सर्वांत सुरक्षित ठिकाण म्हणजे तेथील उंच शिखर– पिको तुर्किनो. त्या ठिकाणी बाटिस्टाचे सैनिक जाऊन पोहोचणे शक्य नव्हते. म्हणून फिडेलची १२ जणांची तुकडी ते शिखर चढून गेली आणि त्याच ठिकाणी या निधड्या क्रांतिकारकांनी आपला पहिला तळ स्थापन केला. हे थकलेभागलेले उपाशी बंडखोर मोठ्या उमेदीने क्रांतीच्या संघटनेला लागले !

त्यांच्यापुढे एकच योजना होती. मुक्तपणाने हालचाल करता येईल अशी जागा शोधून काढल्यानंतर या तळाची व्याप्ती वाढविणे, स्थानिक शेतकऱ्यांची मदत मिळवून खाण्यापिण्याची व्यवस्था करून घेणे, जंगलभर घुसलेल्या बाटिस्टाच्या सैनिकांना गाठून त्यांची शस्त्रे पळवून आणणे आणि देशातील 'सव्वीस जुलैच्या चळवळी'-

बद्दल निष्ठा असलेल्या लढाऊ लोकांबरोबर संपर्क साधून उठावाची तयारी करणे, असा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम फिडेलने तयार केला. एकही दिवस फुकट न घालविता त्याच्या हालचाली सुरू झाल्या.

तेथील रहिवाशांबरोबर प्रेमाने वागून, त्यांना औषधपाण्याची मदत करून या मंडळींनी लवकरच त्यांचा विश्वास संपादन केला. शहरात बातम्या नेण्याआणण्यासाठी त्यांचा चांगला उपयोग होऊ लागला. सलीम जुलैच्या कार्यकर्त्यांपर्यंत फिडेलबद्दलच्या बातम्या पोहोचल्या. शहरातून बंदुका व माणसे येऊ लागली; अर्थात अत्यंत गुप्तपणाने. पैसेही येऊ लागले. त्यामुळे बंडखोरांना शेतकऱ्यांकडून खाद्यपदार्थ विकत घेणे आणि ठिकठिकाणी त्यांचे साठे करून ठेवणे शक्य झाले. काही शेतकऱ्यांची मुलेही त्यांना येऊन मिळाली, परंतु जवळ शस्त्र असेल तरच त्यांना गटात सामील करून घ्यायचे, असा कडक नियम फिडेलने केला होता.

होता होता १२ बंडखोरांचे १८ झाले. २० सैनिक व २० बंदुका एकत्र झाल्या की दोन महिन्यात जोरदार लढाई सुरू करण्याचा फिडेलचा बेत होता! बाटिस्टा व त्याची अजस्र फौज किस झाड की पत्ती! सिएरा मेस्त्रात आसरा घेतलेल्याला दोन महिने होऊन गेले होते आणि जीवन कमालीचे कष्टाचे होते, पण फिडेलची पहाटेपासून रात्रीपर्यंत पायपीट आणि डावपेचांच्या दृष्टीने आखणी अव्याहत चालू होती.

या काळात दोन महत्त्वाच्या गोष्टी घडल्या, आणि कधीच ओहोटी माहीत नसलेल्या फिडेलच्या उत्साहाला अधिकच उधाण आले.

आपल्या अस्तित्वाला प्रसिद्धी मिळावी, असे त्याच्या मनात आले. तो मरण पावला असल्याच्या बातम्या अमेरिकेत पसरलेल्या होत्या. पण एकाही पत्रकाराने सत्य शोधण्यासाठी सिएरा मेस्त्राला भेट दिली नव्हती. एखाद्या वार्ताहराला गुपचूपपणे पहाडावर पाठवावे असे फिडेलने त्याच्या विश्वासू मित्रांना कळविले.

न्यूयॉर्क टाइम्सचा वार्ताहर हर्बर्ट मॅथ्यूज याने त्याच्या पत्नीसह पोलिसी व सैनिकी पहारे चुकवून सिएरा मस्त्रात प्रवेश केला. त्याने एक सबंध दिवस कॅस्ट्रोबरोबर घालविला आणि मुलाखत त्याच्या वृत्तपत्रात प्रसिद्ध केली. त्याबरोबर कॅस्ट्रोचे नाव संपूर्ण अमेरिकेत गाजले. आणि लॅटिन अमेरिकेतील अन्यायाविरुद्ध लढणाऱ्यांचे प्रतीक म्हणून ठिकठिकाणचे क्रांतिकारक त्याच्याबद्दल उत्सुकता दाखवू लागले.

याच सुमारास सव्वीस जुलैच्या निवडक कार्यकर्त्यांची बैठकही सिएरा मस्त्रात भरली आणि शहरातून आणखी मदत देण्याचे ठाम आश्वासनही बंडखोरांना मिळाले.

सिएरा मस्त्रा पहाडाचा कोपरान् कोपरा कॅस्ट्रोला परिचित झाला. सर्व मार्ग, वस्त्या, तेथे राहणारे लोक, त्यांचा स्वभावधर्म, त्यांची निष्ठा व सहनशक्ती या सगळ्यांचा त्याने अभ्यास केला आणि तरीही अनेकदा अनेकांनी त्याचा विश्वासघात केला. अगदी भाडोत्री मारेकऱ्यांनीदेखील त्याच्या गटात प्रवेश मिळवला. पोलिसांचा छळ सहन न होऊन अनेक शेतकऱ्यांनी देता आली ती माहिती पोलिसांना पुरवली. त्यामुळे अनेकदा नुकसान झाले, परंतु या सर्वांतून धडे शिकत फिडेल आपला मार्ग काढीत राहिला. फिडेलची मुलाखत छापून आल्यावर बाटिस्टाने सुमारे १० हजार सैनिक त्याला शोधून काढण्यासाठी पाठविले. फिडेलला पकडून देणाऱ्यासाठी मोठे बक्षीसही लावण्यात आले होते. आणि तरीदेखील त्याला स्वस्थ बसून चालण्यासारखे नव्हते.

ला प्लाटा येथील काही छोट्या बराकींवर त्याने हल्ला चढविला. तो यशस्वी झाला. आणि त्यांना आठ बंदुका, एक मशीनगन व सुमारे हजार काडतुसे मिळाली. बंडखोरांचे मनोधैर्य वाढले. पण परिस्थिती अत्यंत बिकटच होती. पुढील कार्यक्रमांची आखणी करण्यासाठी शहरातून कुमक येण्याची बंडखोर आतुरतेने वाट पाहत होते.

शहरातील परिस्थितीही तंग झाली होती. मार्चच्या १३ तारखेला काही विद्यार्थ्यांनी हवानातील बाटिस्टाच्या राजवाड्यावर हल्ला चढविला. बाटिस्टा दुर्दैवाने निसटला आणि सैनिकांनी विद्यार्थ्यांना घेरून गोळीबार केला. काही मिनिटातच राजवाड्यात शिरलेले १५ तरुण रक्ताच्या थारोळ्यात मरून पडले. त्यातील बहुतेक कम्युनिस्ट होते.

या हल्ल्यामुळे सर्वत्र फार मोठी खळबळ उडाली. दडपशाही व धरपकड बेसुमार वाढली. संशयितांना विनाचौकशी गोळ्या घालण्यात येऊ लागल्या. त्यामुळे बाटिस्टाविरोधी जनमतही अधिक तीव्र झाले.

त्याच सुमारास बाटिस्टावर आणखीन दडपण आणण्यासाठी कलिक्सो सांचेझ या तरुणाने मेक्सिको-मधून एका सशस्त्र तुकडीला क्युबाच्या किनाऱ्यावर उतरविण्याचा प्रयत्न केला. पण ती बातमी सैनिकांना आधीच मिळाल्यामुळे त्यांच्यापैकी १७ जणांना गोळ्या घालून मारण्यात आले. त्यातील १० जण निसटले. आजूबाजूच्या प्रदेशात भूमिगत होऊन काम करू लागले. फिडेल कॅस्ट्रोभोवतालचा लष्करी वेढा मात्र कायम राहिला.

अखेर १६ मार्चला वेढ्याला शह देऊन ५० सशस्त्र तरुणांची कुमक फिडेलपर्यंत पोहोचली. ते आधीच अननुभवी होते. त्यांना शिक्षण देण्यात आले. तहानभूक सहन करायला ते शिकले. हालअपेष्टा सहन करून येणारी क्रांतिकारक हिंमतही त्यांच्यात निर्माण झाली.

हळूहळू बंडखोरांनी घनदाट व्यापलेला भूभाग पूर्ण मुक्त केला. बाटिस्टाच्या सैनिकांना तेथे घुसणे अशक्य झाले. मित्र झालेल्या शेतकऱ्यांच्या घरात अन्नाचा व शस्त्रास्त्रांचा साठा करण्यात आला. अशा तऱ्हेच्या

गुप्त ठिकाणांचे जाळेच सिएरा मेस्त्रात निर्माण झाले. शहरातून माल अगर संदेश आणणाऱ्या दूतांची ती विश्रांतीस्थाने झाली.

हळूहळू स्थानिक शेतकऱ्यांचा पाठिंबाही वाढू लागला. शेतकऱ्यांची तरुण, बेकार मुले बंडखोरांना येऊन मिळू लागली. बाटिस्टांचे सैनिकांनी शेतकऱ्यांचा छळ व खून करण्याचा सपाटा सुरू केला. त्यामुळे तर ते फिडेलच्या अधिकच जवळ आले.

त्यानंतर मोठ्या मोहिमा करण्याचा फिडेलने बेत केला. ओरियेन्ते प्रांतातील दक्षिण किनाऱ्यावर सिएरा जवळच उव्हेरी हा एक बाटिस्टाचा लष्करी तळ होता. २८ मे १९५७ रोजी त्यावर हल्ला चढवायचा, अचानक आक्रमण करून शत्रूला चकित करावयाचे, मिळतील ती शस्त्रास्त्रे पळवून पुन्हा सिएरा मेस्त्रातील सुरक्षित स्थळी आश्रय घ्यायचा अशी ही योजना होती.

रात्रीच्या वेळी १६ किलोमीटर चाल करून बंडखोरांनी तळाच्या तिन्ही बाजूंनी वेढा घातला. चवथ्या बाजूला समुद्र होता. बंडखोरांची संख्या ८० होती, सैनिक ५३ होते. पावणेतीन तास घनघोर लढाई झाली आणि सैनिक शरण आले. फिडेलचे ६ जवान ठार झाले. सैनिकांपैकी १४. नागरिक राहत असलेल्या वस्त्यांवर गोळीबार करण्याचे बंडखोरांनी टाळल्यामुळे एकही नागरिक ठार झाला नाही. प्रचंड शस्त्रसंभार, औषधे व इतर उपयुक्त वस्तू घेऊन गनिमी सैन्य पसार झाले.

जाताना फिडेलने स्वतःच्या व शत्रूच्याही जखमी सैनिकांची औषधोपचार करण्याची सोय केली.

एल उव्हेरीवरील विजयी हल्ल्याने संपूर्ण क्यूबात खळबळ माजवली. फिडेल कॅस्ट्रो मोठ्या संख्येने सिएरा मेस्त्रोत वावरत आहे आणि त्याची ताकद बाटिस्टाला आव्हान देण्याइतकी वाढली याची लोकांना खात्री

पटली. सिएराच्या जवळपासच्या लहान लहान चौक्या लष्कराने हालविल्यामुळे गनिमांना मुक्त संचार करता येऊ लागला. शहरातून, खेड्यांतून बंदुका घेऊन येणाऱ्या तरुणांची रीघ लागली आणि बंडखोरांची संख्या २०० वर गेली. पूर्वी रात्रीदेखील त्यांना हळू बोलावे लागत होते; आता ते मुक्तपणाने गप्पागोष्टी करू लागले.

शहरातील चळवळही जोमदार होऊ लागली. सव्वीस जुलैच्या कार्यकर्त्यांनी राजधानी हवानातील प्रमुख विद्युत्‌केन्द्र‌च उडवून दिले आणि दोन रात्री राजधानीत काळोख पसरला. याच सुमारास चर्चमधील एका गटाचाही फिडेलला पाठिंबा असल्याचे निदर्शनास आले आणि त्याची फळी अधिक भक्कम झाली.

आता फिडेलही स्वतंत्र क्यूबाच्या भवितव्याचा विचार उमदीने व जाहीरपणे करू लागला. १२ जुलै १९५७ रोजी त्याने सिएरा मेस्त्रामधून त्याचा पहिला जाहीरनामा प्रसिद्ध केला आणि बाटिस्टाचा पराभव करण्यासाठी सगळ्या लोकांनी सहकार्य करावे असे आवाहन केले.

सर्व क्रांतिकारक बंडखोर संघटना, सर्व नागरी संघटना व सर्व साम्राज्यशाहीविरोधी राजकीय पक्ष यांची व्यापक क्रांतिकारक आघाडी उभारण्यावर जाहीरनाम्यात भर होता.

अशी लढाऊ आघाडी, विजयानंतर येणाऱ्या तात्पुरत्या सरकारचा अध्यक्ष ठरवील, क्यूबातील अन्तर्गत राजकारणात कोणालाही हस्तक्षेप करू दिला जाणार नाही, आणि लष्कराला राज्यसत्तेपासून अलग ठेवून वर्ष-भरात निवडणुका घेतल्या जातील अशा घोषणा जाहीरनाम्यात करण्यात आल्या होत्या, शेतकऱ्यांच्या व गरिबांच्या हिताच्या दृष्टीनेही कार्यक्रमात काही योजना मांडण्यात आल्या.

कॅस्ट्रोजवळ सिएरा मेस्त्रात एक जोरदार ट्रान्झिस्टर आला आणि सिएरातील नेत्यांचा आवाज क्यूबाभर

घुमू लागला. फिडेलची भाषणे अनेक लोक एकत्र जमून ऐकू लागले. जणू त्या छोट्या छोट्या जाहीर सभाच भरत होत्या.

फिडेलच्या प्रभावाचा फायदा घेऊन काही दरोडेखोरांनी लुटालूट करण्यास व सिएरा मेस्त्रात धुमाकूळ घालण्यास प्रारंभ केला. त्यांना पकडून गोळ्या घालण्यात आल्या. सिएरातील शिस्त चांगलीच कडक आहे हे संधीसाधूंना समजून चुकले.

आता सिएरामधील बराच मुलूख बंडखोरांच्या ताब्यात आला. १९५७ च्या सुमारास एक जलविद्युत केंद्र सुरू करण्याची जोमाने तयारी चालविली. क्रांतिकारकांचे वृत्तपत्रही निघू लागले.

मग मात्र बाटिस्टाचे धावे दणाणले. त्याच्या लष्कराने आजूबाजूच्या खेड्यांत दहशत बसविण्यासाठी तरुण मुलांना गोळ्या घालून ठार मारायला सुरुवात केली. त्यामुळे बाटिस्टा राजवट जनतेपासून अगदीच अलग पडली.

बाटिस्टाने सिएरा मेस्त्रा निर्मनुष्य करायचा घाट घातला. त्यासाठी स्त्रिया, मुले व म्हातारी माणसे जबरदस्तीने त्यांच्या घरादारातून हाकलून काढून शहराकडे धाडण्यात आली. तेथे त्यांची काहीच सोय नव्हती. आपल्या देशबांधवांच्या या हालअपेष्टा पाहून क्यूबन जनता खवळली. बाटिस्टावर आंतरराष्ट्रीय दबावही आला. तेव्हा निर्वासितांना परत पाठविण्यात आले, परंतु त्यांची घरे लष्कराने आधीच जाळून टाकली होती. नव्या झोपड्यांची उभारणी करताना ते सतत बाटिस्टाचा उद्धार करीत होते आणि त्याला नेस्तनाबूद करण्याची प्रतिज्ञा करीत होते. त्यांच्या कुटुंबातील तरुण मुले आधीच गनिमांना जाऊन मिळाली होती.

५ सप्टेंबर १९५७ ला शेनफुगो नाविक तळावर उठाव झाला. तो जरा अकालीच झाला; म्हणजे इतर सर्व ठिकाणांच्या उठावांची साथ त्याला वेळेवर मिळाली नाही. उठाव तात्पुरता यशस्वी झाला आणि सबंध शहर नाविकांच्या व सव्वीस जुलैच्या कार्यकर्त्यांच्या ताब्यात आले. परंतु प्राप्त परिस्थितीत बाटिस्टाची सगळी शक्ती त्यांच्यावर तुटून पडली आणि क्रांतिकारकांनीही रक्ताचा शेवटचा थेंब शरीरात असेपर्यंत शहर झुंजविण्याचा निर्णय घेतला. परिणामी, या धाडसी बंडखोरांची सर्रास कत्तल झाली. क्यूबाच्या इतिहासात आणखी एक पान रक्ताने लिहिले गेले.

या कत्तलीला उत्तर म्हणून फिडेलने आणखी एक जाहीरनामा काढला आणि बाटिस्टाची राजवट कोसळेपर्यंत सशस्त्र लढा चालूच राहील ही घोषणा पुन्हा एकदा सर्वत्र घुमविली.

६. महान क्रांतिकारकांचा महान विजय

१९५८ साल उजाडले आणि या वर्षभरात अनेक रोमांचकारी घटना घडल्या. फिडेल कॅस्ट्रोच्या नेतृत्वाखालील क्यूबन क्रांतीची परिसीमा गाठली जाण्याची वेळ इतक्या वेगाने आली की तिने सगळ्या जगाला आश्चर्यात बुडविले.

बाटिस्टाच्या लष्करी मोहिमांना तोंड देण्यासाठी गनिमी सैनिकांनी आक्रमक पवित्रा घेतला. फिडेल कॅस्ट्रो, चे गव्हेरा, राउल कॅस्ट्रो यांच्या सेनापत्याखालील लहान लहान फौजा लष्कराची त्रेधातिरपीट उडवीत होत्या. क्रांतिकारकांचे जाळे दूरवर पसरले. मार्च महिन्यात तर मेक्सिकोमधून गुप्तपणे विमानातून थेट सिएरात शस्त्रपुरवठा होऊ लागला.

९ एप्रिलला सर्व शहरांतून एकदम सार्वत्रिक संप सुरू करण्याचा निर्णय सव्वीस जुलैच्या कार्यकर्त्यांनी घेतला आणि मार्च महिनाभर गुप्तपणे संपाची तयारी चालविली. संपाचा दिवसही गुप्त ठेवण्यात आला होता.

संपाला मदत करण्यासाठी गनिमी सैनिकांनी आक्रमक चढाया सुरू केल्या. ९ एप्रिलला हवानातील दूरध्वनी केंद्र ताब्यात घेऊन सार्वत्रिक संपाची घोषणा करण्याचे ठरले. परंतु ही योजना असफल झाली; थोड्या चकमकी झडल्या आणि गोळीबार करीत बाटिस्टाचे सैन्य क्रांतिकारकांच्या मागे लागले. अर्ध्या तासात १४० तरुण गोळीबाराला बळी पडले. हवानाखेरीज इतर शहरांत मात्र अधिक मोठे उठाव झाले. सिएरातील गनिमी सैनिकही सपाट मैदानावर येऊन लढाईत सामील झाले. तीन-चार ठिकाणी लष्करी तळांवर हल्ले चढवून ते परत पहाडात पसार झाले.

पोलिसांची दडपशाही वाढली. बाटिस्टाचे लष्कर अमेरिकन शस्त्रास्त्रेच वापरीत होते. खेड्यांवरही नागरी वस्तीचा विचार न करता विमाने बाँबवर्षाव करीत. हे बाँबही साधे नसत. प्रचंड शक्तीची अमेरिकन रॉकेटस् त्यांचे वायुदल वापरीत असे. स्त्रिया, मुले, म्हातारी माणसे, गुरढोरे या बाँम्बना बळी पडत.

या प्रकरणी अमेरिकेत टीका होऊ लागली. एका महिन्यात अशी ६०० रॉकेटस् अमेरिकेने पाठविल्याची बातमी बाहेर फुटली आणि यापुढे शस्त्रास्त्रे पाठविणार नाही असे अमेरिकन सरकारने जाहीर केले. अर्थात इतर दक्षिण अमेरिकन देशांतून अमेरिकन शस्त्रास्त्रांचा पुरवठा चालूच राहिला. या मानभावीपणामुळे क्यूबाच्या लोकांत अमेरिकेबद्दलचा संताप अधिकच वाढला. हे अत्याचार इतके शिगेला पोहोचले की कित्येक अमेरिकन वैमानिकच शस्त्रास्त्रांसह सव्वीस जुलैच्या कार्यकर्त्यांना सामील झाले.

१९५८ च्या मे अखेरीस बाटिस्टा सर्व शक्तीनिशी गनिमांना नष्ट करण्याच्या मोहिमेत उतरला. सारे

सैन्य, विमाने, रणगाडे, रॉकेटस् अशी सगळी सामग्री त्याने गनिमांविरुद्ध वापरली. सिएरावरील गनिमांना भयानक परिस्थितीला तोंड दयावे लागले; ते नष्ट होता होता वाचले.

बातिस्टाची तयारी पाहून कॅस्ट्रोने दूरवर पसरलेल्या आपल्या तुकड्यांना सिएरा मेस्त्रात एकत्र केले. पिको तुर्कीनो या मुख्य तळाभोवती संरक्षणासाठी ६ तुकडया उभ्या केल्या. त्यांचे नेतृत्व होते फिडेल कॅस्ट्रो, मेजर अल्मेडा; कॅमिलो शेनफुगो, चे गव्हेरा, गभिरो वाल्हेस व क्रेसेन्शो परेझ यांच्याकडे. या गनिमांनी आपल्या तळाभोवती तीस किलोमीटर्सची वर्तुळाकार साखळी केली. यावेळी कॅस्ट्रोजवळ ३०० गनीम होते, तर बातिस्टाचे १० हजार सैनिक चाल करून येत होते. त्यांनी बंडखोरांच्या कळ्याभोवतालचा वेढा आवळीत आणला.

अखेर पिको तुर्कीनोच्या उतारावर लढाईला तोंड लागले. चार दिवस तुंबळ युद्ध झाले. विमाने बाँबवर्षाव करीत होती, पण ती कोणावर नेमके बाँब टाकीत होते, ते त्यांचे त्यांनाच कळत नव्हते.

ही लढाई पुढे कमीजास्त प्रमाणात जून-जुलै दोन महिने चालली. बातिस्टाचे रणगाडेही निरुपयोगी ठरू लागले. त्यांना मिळणारी सामग्री बंडखोर मधल्यामध्ये पळवून नेत, कारण जंगलच्या वाटा त्यांनाच फक्त चांगल्या माहीत होत्या. अनोळखा प्रदेश व उपासमार याने बातिस्टाची फौज पार गारठली. अखेर ऑगस्टच्या मध्यावर वेढा उठवून लष्कर मागे गेले. क्रांतिकारकांनी ४४३ सैनिकांना पकडले होते, ते त्यांनी रेडक्रॉसच्या स्वाधीन केले. नाहक रक्तपात–अगदी शत्रू सैन्याचादेखील– क्रांतिकारकांनी कधी केला नाही. या लढाईत त्यांनी प्रचंड मनोधैर्य, रणगाडे, मॉर्टर्स, तोफा, बंदुका व दारूगोळा अशी अमोल सामग्री कमावली. समोरासमोरच्या लढाईत बातिस्टाने एवढा मोठा मार प्रथमच खाल्ला ! पण तरीही त्याचा अर्थ मात्र त्याला समजला

नाही! कॅस्ट्रोच्या व क्यूबन बंडखोरांच्या उठावाचा धुव्वा आपण कधीही सहज उडवू अशीच स्वप्ने तो पाहत राहिला!

मिळालेल्या विजयाचा बरोबर निष्कर्ष काढून क्रांतिकारकांनी अखेरचा हल्ला चढविण्याची योजना आखली.

क्यूबाच्या दक्षिण टोकाकडून एका फौजेने, मध्यभागावर दुसऱ्या तुकडीने आणि अगदी शेवटच्या उत्तर टोकावरून तिसऱ्या तुकडीने हल्ला करून संपूर्ण क्यूबावर कबजा मिळविण्यासाठी त्यांनी मोर्चे बांधले.

मध्य क्यूबातील लास विलासकडे चे गव्हेराच्या तुकड्या ३० ऑगस्ट रोजी निघणार होत्या. परंतु त्यांच्यासाठी पेट्रोल घेऊन येणारा ट्रक शत्रूच्या हाती पडला आणि चेची बंडखोर तुकडी पायदळ बनली. या सैनिकांनी शेकडो मैलांचा प्रवास केला. घनघोर वादळ व तुफान पाऊस यांना तोंड देत ते पुढे सरकत होते. मोठे रस्ते त्यांना वर्ज्य होते. त्यामुळे जड शस्त्रास्त्रे व रॉकेटस् वगैरे खांद्यावर घेऊन नद्या, नाले, ओढे पार करीत दलदलीतून त्यांचा मोर्चा चालू होता. वाटेत विश्रांती घेणेही अशक्य होते. कारण वस्तीची ठिकाणे त्यांना टाळायची होती. पण इतकी काळजी घेऊनही एका ठिकाणी शत्रूच्या लष्कराबरोबर चकमक झडली आणि शत्रूसैन्य त्यांचा पाठलाग करू लागले. बॉंबफेकी विमाने डोक्यावर घिरट्या घालू लागली. थोडे मोकळ्या जागेवर आले की बॉंबवर्षाव सुरू होई. जखमी गनिमांना सांभाळीत, स्थानिक लोकांचे साहाय्य घेत ते तसेच धडपडत राहिले आणि अखेरीस ६ ऑक्टोबरला सिएरा दि एस्कांब्रेच्या पहाडातील एका सुरक्षित तळावर पोहोचले. कॅमिलोची तुकडीही त्यांना येऊन मिळाली. त्यांची स्थितीही चेच्या लढवय्यांपेक्षा निराळी नव्हती.

" त्या ३१ दिवसांत त्यांना फक्त ११ वेळा काहीतरी खायला मिळाले होते. घोड्याचे कच्चे मांसही मिठाशिवाय खावे लागले होते ! "

त्यावेळी बातिस्टाने नामधारी निवडणुका जाहीर केल्या होत्या. क्रांतिकारकांनी निवडणुकांवर बहिष्कार घालायचे आवाहन केले आणि मतदान अगदी किरकोळ झाले. बातिस्टावर लोकांनी अविश्वास व्यक्त केला. इतकेच नव्हे तर, क्रांतिकारकांकडे तरुणांचा ओघ सुरू झाला आणि लास विलास प्रांतात ते सर्वत्र मुक्तपणे संचार करू लागले. चे व कॅमिलो यांच्या तुकडया फौजा म्हणविण्याइतपत वाढल्या.

त्या प्रांतातील सर्व दळणवळण क्रांतिकारकांनी बंद पाडले. रस्ते तुटले होते, पूल पडले होते, टेलि-फोनच्या तारा तोडल्या होत्या, रेल्वे रूळ नादुरुस्त होते. अशा रीतीने हा क्यूबाचा मध्य विभाग बंडखोरांच्या ताब्यात आल्यामुळे क्यूबाचे दोन भाग झाले. ओरियेन्ते प्रांताकडे मदत धाडण्यासाठी विमाने अगर बोटी याखेरीज अन्य मार्ग उरला नाही.

इकडे दक्षिणेकडे ओरियेन्ते प्रांतात फिडेल व राऊल कॅस्ट्रो यांच्या फौजांनी ७ नोव्हेंबरला सांत्यागो-दि-क्यूबा शहराकडे आगेकूच सुरू केली. शत्रूसैन्याला समोरासमोर तोंड देता येईल इतकी आता त्यांची संख्या वाढलेली होती. वाटेतील लहानमोठी शहरे काबीज करीत त्यांच्या फौजेने सांत्यागो काबीज केले आणि नव्या क्रांतिकारक सरकारची स्थापना झाल्याची घोषणा केली.

पण फिडेल सांत्यागोला पोहोचण्यापूर्वीच चे गव्हेराच्या फौजेने लास विलासची राजधानी सांता-क्लारा या दीड लाख वस्तीच्या गावाला वेढा घातला. घनघोर युद्धाला तोंड लागले. सांताक्लाराची संरक्षण फळी मजबूत होती. सरकारी लष्कराजवळ रणगाडे व युद्धसामग्री विपुल होती. पण गनिमांची धडक इतकी

जोरदार होती की लष्कराचे मनोधैर्य खचून गेले. ३० डिसेंबरला रेडिओ स्टेशन ताब्यात घेऊन चेने मुक्ती-लढ्याचा विजय झाल्याची घोषणा केली आणि त्यानंतर इतर लष्करी केंद्रे शरण येऊ लागली.

फिडेलने चे गव्हेराला हवानावर चालून जाण्याचा आदेश दिला. परंतु १ जानेवारी १९५९ च्या पहाटे हवानाच्या विमानतळावर बाटिस्टासह त्याचा सगळा परिवार, धनदौलतीच्या बॅगा घेऊन सज्ज झाला होता. बाटिस्टाचे बडे बडे लष्करी अधिकारीही त्याच तयारीत होते. अमेरिकन विमाने आली आणि या जुलूमशहांनी अक्षरशः पलायन केले.

ही बातमी शहरात पसरताच जल्लोष सुरू झाला. क्यूबाचे लोक आनंदाने गात-नाचत एकमेकांना मिठ्या मारू लागले.

२ जानेवारी रोजी फिडेल सांन्यागो शहरात शिरला, तेव्हा त्याचे भव्य स्वागत झाले. मोंकाडा बराकी बंदुकांची एकही गोळी न झाडता शरण आल्या. फिडेलने ५॥ वर्षांपूर्वी केलेली प्रतिज्ञा पूर्ण झाली— करेंगे या मरेंगे— घोषणा त्याने विजयापर्यंत लढाया करून प्रत्यक्षात उतरवली.

बाटिस्टाची ३० हजारांची अमेरिकन शस्त्रास्त्रांनी सज्ज असलेली फौज गनिमांनी निकामी ठरविली आणि जगातील क्रांतिकारकांच्या इतिहासात मानाचे स्थान मिळविले.

हवानात फिडेलचे स्वागत अवर्णनीय असे झाले. कबुतरांचे थवे आकाशात उडविण्यात आले आणि क्यूबात शांतीचे, स्वातंत्र्याचे व जनतानिष्ठ देशभक्तांचे राज्य सुरू झाले. क्यूबाच्या इतिहासातील हा अविस्मरणीय देदीप्यमान दिवस ठरला.

७. स्वातंत्र्यानंतरची पहाट

क्रांतीचा विजय झाला. विजयी वीर म्हणून फिडेलचे व त्याच्या सहकाऱ्यांचे संपूर्ण क्यूबात अद्भुतरम्य स्वागत झाले. लोकांचा उत्साह शिगेला पोहोचला होता; पण फिडेल चिंताग्रस्त होता.

सत्ता मिळविणे ही त्याची महत्त्वाकांक्षा नव्हती. त्याच्या अवतीभोवती, मनात, विचारात सर्वत्र क्यूबा व क्यूबातील लोक होते. बहुसंख्य लोक गरीब, अर्धपोटी, रोगग्रस्त, निरक्षर व अज्ञानी होते. क्यूबा अविकसित होता. एक उसाच्या मळ्यांखेरीज व साखरउत्पादनाखेरीज तेथे नाव घेण्यासारखा दुसरा उद्योग नव्हता.

प्रारंभी फिडेलला वाटत होते की सत्तेत भागीदारी न करता आपण लोकांत राहून, लोकांच्या उन्नतीसाठी कार्य करावे.

विजय जवळ आल्याचे पाहताच त्याच्या संमतीने एका तात्पुरत्या सरकारची घोषणा करण्यात आली होती. त्यात सर्व प्रतिष्ठित वर्गातील व्यक्तींचा—छापखान्यांचे मालक, व्यापारी, बँकांचे चालक अशा व्यक्तींचा— समावेश होता. ते बहुतेक सर्व मध्यम वयाचे होते; पण देशप्रेमी व बातिस्टाविरोधी होते. त्यांच्या माहात्म्याने देशाची उन्नती होऊ शकेल आणि शेतकरी-कामगारांच्या हिताचे कार्य सर्व समाजगटांच्या पाठिंब्याने होऊ शकेल, असे त्याला वाटत असे.

तो आपले भव्य स्वप्न त्याच्या सभांतून, दूरध्वनी व दूरदर्शन यांच्या माध्यमातून लोकांसमोर मांडीत होता. दररोज जवळजवळ ९९ टक्के लोकांच्या कानांवर त्याची भविष्यवाणी पडत होती.

आर्थिक-सामाजिक क्रांतीचा कार्यक्रम तो मांडीत असे; असा सामाजिक बदलाचा मूळ पाया घालण्यासाठी संपत्तीचे वाटप झाले पाहिजे, सर्वांना प्रगतीसाठी समान संधी मिळाली पाहिजे, शेतीसुधारणा अंमलात आणल्या पाहिजेत, परकीय आर्थिक वर्चस्व झुगारून दिले पाहिजे, असा त्याचा आग्रह होता.

या झंझावाती प्रचारामुळे तो सगळ्यांचे आशास्थान बनला, आणि क्यूबात जणू काही दोन सरकारे निर्माण झाली. खरी सत्ताधारी मंडळी फिडेल व त्याचे सहकारीच आहेत, अशी भावना पसरली. शिवाय फिडेलचे जहाल विचार तात्पुरत्या सरकारातील मंत्र्यांना व अधिकाऱ्यांना पेलवत नव्हते, अतिरेकी वाटत होते. ते सतत नापसंती व्यक्त करू लागले.

अखेर मंत्रिमंडळाच्या मुख्य मंत्र्याने राजीनामा दिला आणि १६ फेब्रुवारी रोजी फिडेलने पंतप्रधान म्हणून सूत्रे हाती घेतली.

३२ वर्षांचा फिडेल राज्यकारभारात अगदी अनभिज्ञ होता. आणि त्याच्याहीपेक्षा वयाने लहान असलेले, ३० च्या आसपासचे त्याचे सहकारीही तसेच अननुभवी, प्रशिक्षण न झालेले, हौशी होते; पण ते तेवढेच उत्साही, प्रामाणिक, देशप्रेमी व कष्टाळू होते. त्यांच्या आधारावर फिडेलचा कारभार चालू झाला.

बाटिस्टा अनेक वर्षे क्यूबाचा सर्वाधिकारी होता. तो गेला आणि क्यूबात सैन्य राहिले नाही, पोलीस राहिले नाहीत, न्यायव्यवस्था राहिली नाही. कोणत्याही प्रकारचा व्यवस्थापकीय अधिकारीवर्ग राहिला नाही.

कॅस्ट्रोने त्याच्या क्रांतिकारक गनिमी फौजेला संघटित करून सैन्यदल तयार केले. क्रांतीच्या पहिल्या

उठावापासून सिएरा मेस्त्रात लढणारे त्याचे सहकारी व क्यूबात सर्वत्र पसरलेले सव्हीस जुलैच्या संघटनेचे सहकारी निवडून काढले. क्यूबन क्रांतीच्या काळात क्यूबाच्या कम्युनिस्ट पक्षाच्या सदस्यांनी सव्हीस जुलै संघटनेच्या कार्यकर्त्यांबरोबर संपूर्ण सहकार्य केले होते, काही प्रमुख पक्ष-पुढारी सिएरामध्येही गनिमी सैनिकांबरोबर लढले होते. या सर्वांना एकत्र आणून कॅस्ट्रोने त्यांची शासकीय अधिकारपदावर नियुक्ती केली. त्यांची निष्ठा, लोकांच्या हितासंबंधीची कळकळ व लाचलुचपत व भ्रष्टाचार यांना असलेला विरोध यामुळे फिडेलचा त्यांच्यावर विश्वास होता.

फिडेलच्या या कृतीचा फायदा घेऊन अमेरिकेत पळून गेलेल्या क्यूबन निर्वासितांनी कॅस्ट्रो कम्युनिस्ट आहे, असा 'पुरावा' अमेरिकेच्या हेरखात्याला व लष्करी अधिकाऱ्यांना सादर केला. या निर्वासितांत प्रामुख्याने बातिस्टाचे सैन्याधिकारी, व्यापारी, जमीनदार, डॉक्टर, वकील व तंत्रज्ञ यांचा समावेश होता. फिडेलविरुद्ध अमेरिकेत धडाक्याने प्रचार सुरू झाला.

वास्तविक अकल्पित वेगाने विजयी झालेली क्रांती हे जसे क्यूबन क्रांतीचे वैशिष्ट्य होते, तसेच क्रांतीनंतर माजणारे अराजक, दंगेधोपे व रक्तपात यांचा अभाव हेही तिचे उल्लेखनीय वैशिष्ट्य होते. शत्रुसैनिक, बातिस्टाचे क्रूर व छळवादी अधिकारी ताब्यात आले असताही त्यांना लोकांनी घेरून मारू नये, असा आदेश फिडेलने दिला होता. या धोरणानुसार अनेकांना युद्धकैदी म्हणून पकडण्यात आले आणि क्रांतिकारक खुल्या खटल्यात झटपट निर्णयाने त्यांच्यापैकी ५००-६०० फाशी देण्यात आले. अमेरिकेच्या प्रचार माध्यमांनी या कृतीविरुद्ध कॅस्ट्रो सरकारविरुद्ध गदारोळ उठवला. बातिस्टाच्या राजवटीच्या काळात दोनदोन, तीनतीन

वर्षे छळ केल्यानंतर सुमारे २० हजारांपेक्षा अधिक क्यूबन लोकांना ठार मारण्यात आले होते, त्याचे मात्र अमेरिकेला संपूर्ण विस्मरण झालेले होते. या अन्यायाने क्यूबातील जनमत अधिक संतप्त झाले.

पण कशाकडेही लक्ष न देता आपल्या मार्गाने पुढे जाण्याचा निश्चय अधिकच निर्धाराने अंमलात आणण्यासाठी फिडेल सज्ज होता.

सशस्त्र क्रांती करण्यापेक्षाही आर्थिक-सामाजिक न्याय्य समाजव्यवस्था प्रस्थापित करणे अधिक बिकट आहे, याचे भान असलेल्या फिडेलला जास्तच दृढनिर्धार करावा लागला. नव्या शेतीविषयक सुधारणांची त्याने आखणी व जाहीर घोषणा करण्यास प्रारंभ केला.

१९५९ च्या मार्चमध्ये घोषणा करण्यात आली की बातिस्ताला पाठिंबा देणाऱ्या सर्व जमीनदारांच्या जमिनी सरकारने ताब्यात घेतल्या आहेत.

१७ मेला जमीनसुधारणा कायदा जाहीर करण्यात आला. त्यानुसार सर्व जमिनी सरकारने जप्त केल्या. ऊस मळे, तंबाखूचे मळे व साखर कारखाने यांच्या स्वामीमुळे जमीनमालकीची मक्तेदारी अमेरिकन कंपन्यांकडेच होती. क्यूबन लोक फक्त शेतमजूरच होते. या कायद्याचा अमेरिकेने निषेध केला आणि नुकसान-भरपाईची मागणी केली. फिडेलने ती नाकारली.

त्याला प्रत्युत्तर म्हणून १९६० च्या प्रारंभी अमेरिकेने क्यूबाकडून साखर कमी घेण्यास प्रारंभ केला; पुढे क्यूबाला देण्यात येणारी सर्व तांत्रिक मदत रद्द करून तंत्रज्ञांना परत बोलाविले; पुढे अमेरिकन तेल कंपन्यांनी क्यूबाने इतर देशांतून मागविलेले तेलशुद्धीकरण करण्याचे नाकारले; आणि अखेरीस ऑक्टोबरमध्ये अमेरिकेने

क्यूबाची आर्थिक नाकेबंदी जाहीर केली आणि सर्व लॅटिन अमेरिकन देशांना क्यूबाशी व्यापार संबंध न ठेवण्याची ताकीद देऊन क्यूबाला अलग पाडले.

फिडेलचा कार्यक्रमही धुमधडाक्याने चालू राहिला. १९६० च्या मेमध्ये क्यूबाने सोविएत युनियन-बरोबर राजनैतिक संबंध जोडले आणि मित्रराष्ट्र मिळविण्याच्या दृष्टीने प्रथम पाऊल टाकले.

रशियाने क्यूबाकडून साखर खरेदी करून क्यूबाला आर्थिक पेचप्रसंगातून सुटण्यासाठी मदत दिली. बदल्यात तेल विकत दिले आणि सर्व कारखाने बंद पडण्याचा धोका टळला.

जून-जुलैमध्ये क्यूबाने अमेरिकन तेलकंपन्यांचे राष्ट्रीयीकरण केले, पाठोपाठ साखर व रबर कंपन्यांचेही राष्ट्रीयीकरण केले. अमेरिकेच्या मालकीचे टेलिफोन कंपनीचे राष्ट्रीयीकरण प्रारंभीच केले होते. ऑक्टोबरमध्ये सर्वंकष राष्ट्रीयीकरण करून सर्वच भांडवलदार मालकांच्या व साम्राज्यवाद्यांच्या आशा धुळीला मिळविल्या.

परंतु क्यूबाची अर्थव्यवस्था सुव्यवस्थित राखण्यासाठी क्यूबाला नव्या मित्रराष्ट्रांची मदत पाहिजे होती आणि ती देण्याची तयारी सोविएत युनियनने व इतर समाजवादी देशांनी दाखवली. क्यूबात १०० कारखाने उभारून देण्याची रशियाने तयारी सुरू केली.

आणि कॅस्ट्रो कम्युनिस्ट गोटात गेल्याबद्दलचा अमेरिकेतील प्रचार अधिकच जोरात आला. अमेरिकेने क्यूबाशी कायम शत्रुत्व आरंभिले.

८. अमेरिकेची नवी आक्रमणे– अणुयुद्ध संरक्षणाची क्यूबाकडून तयारी

क्यूबाने अमेरिकन साम्राज्यवाद्यांना पुरते चकविले. प्रथम बातिस्टाचा पराभव होईल आणि फिडेल विजयी होईल असे त्यांना वाटलेच नव्हते. आता राजकीय सत्ता हातातून गेली तरी क्यूबात अस्थिरता आहे, तिचा फायदा घेऊन कॅस्ट्रोला शरण आणता येईल, असे त्यांना वाटू लागले होते.

पण फिडेलचे जहाल धोरण दिसू लागताच त्यांना हादरा बसला. ऊस मळे गेले, बहुराष्ट्रीय कंपन्या गेल्या, व्यापार गेला आणि भ्रष्टाचाराच्या आधारावर मिळणारा पैशाचा ओघही थांबला. तेव्हा अमेरिकन भांडवलदारांचा गळाच आवळला गेला. परिणामी अमेरिकेने फिडेल कम्युनिस्ट आहे असा जगभर प्रचार चालविला. याचा अर्थ एकच होता, की फिडेलला सत्तेवरून दूर करून पुन्हा क्यूबात अमेरिकेच्या आर्थिक शोषणाचे जाळे पसरविणे. हे अमेरिकेचे कर्तव्य आहे, अशी विचारसरणी त्यामागे होती.

पण या अशा विचारात सर्वांत मोठा विनोद होता तो निराळाच. फिडेल व त्याचे साथीदार कम्युनिस्ट आहेत, असा प्रचार केला की क्यूबाची जनता फिडेलविरुद्ध उठाव करून उठेल असा अमेरिकन राज्यकर्त्यांचा होरा होता आणि अमेरिकेच्या गुप्तहेर संघटनेने (सी. आय. ए. ने) त्याला खतपाणी पुरविले होते.

झाले. क्यूबावर प्रचंड आक्रमण करण्याची योजना आखण्यात आली. क्यूबन निर्वासितांच्या फौजेने क्यूबाचा एक लहानसा प्रदेश ताब्यात घ्यायचा, तेथे तात्पुरते नवे सरकार स्थापन झाल्याची घोषणा करायची

आणि अमेरिकेला शस्त्रास्त्रे व लष्कर पाठविण्याची विनंती करायची. या फौजांनी फिडेल कॅस्ट्रोचे सरकार उलथून पाडायचे, असे हे साधे, सोपे कारस्थान होते.

क्यूबा हातचा गेला, त्याचे उदाहरण डोळ्यासमोर ठेवून दक्षिण अमेरिकेतील इतर वसाहतीही स्वतंत्र होऊ लागतील, ह्या धास्तीमधून अमेरिकेच्या आततायी कारवाईला जोर चढला होता.

मग अमेरिकेत आक्रमकांना शिक्षण देण्यासाठी लष्करी छावण्या उभारण्यात आल्या. अमेरिकन युद्धतज्ज्ञ १४०० क्यूबन निर्वासितांना कडक शिक्षण देऊ लागले. शस्त्रे पुरविण्यात आली. बोटी, विमाने व इतर युद्ध-साहित्य त्यांना पुरविण्यात आले. तयारी झाली अशी खात्री होताच प्रत्यक्ष हालचालींना आरंभ झाला.

१६ एप्रिल १९६१ च्या गडद काळोखात, मध्य क्यूबाच्या दक्षिण किनाऱ्यावरील 'बे ऑफ पिग्ज' या लहानशा उपसागरातील एका खाडीत एक लहानशी बोट किनाऱ्याला लागली. तिच्या आगमनाची बातमी गस्त घालणाऱ्या पहारेकऱ्यांच्या दक्षतेमुळे लक्षात आली आणि हवाना राजधानीत पहाटे ३ वाजता ती फिडेल कॅस्ट्रोला मिळाली. तोपर्यंत स्थानिक सैनिक संरक्षणाचे काम करीत होते.

फिडेलने तावडतोब देशाला युद्धसज्ज होण्याचा इशारा दिला. त्यावेळी क्यूबाचे संरक्षकदल फारच लहान होते. १२० किलोमीटर दूर अंतरावर सांताक्लारा येथील संरक्षक दल बे ऑफ पिग्जकडे निघाले आणि प्रतिकार सुरू झाला.

सकाळीच फिडेल बे ऑफ पिग्जकडे जाऊन पोहोचला आणि त्याने प्रतिकाराची सूत्रे हातात घेतली.

त्यावेळेपर्यंत आक्रमकांच्या ५ सैनिकी तुकड्या किनाऱ्यावर उतरून अंतर्गत भागात शिरकाव करू लागल्या होत्या. उत्तर, पूर्व व ईशान्य अशा तीन दिशांनी त्या पुढे सरकत होत्या. त्या मुख्य रस्त्यावर येण्या-पूर्वीच त्यांना रोखून धरण्याची सैन्यरचना करण्यात आली. क्रांतिपूर्वकाळातील जुनी दुरुस्त केलेली विमाने अगदीच निकामी आहेत, अशी अमेरिकन अधिकाऱ्यांची माहिती होती. ती विमाने संरक्षणासाठी सज्ज झाली. त्यांनी प्रथम शत्रूची एक बोट बुडविली आणि नंतर एकापाठोपाठ एक ५ अद्यावत विमाने पाडली. क्यूबाचीही दोन विमाने कोसळली. उभयपक्षी लढाई जोरात चालू राहिली.

दुपारी विमानातून बाँबगोळे, मशिनगन्सचा मारा व नापाम बाँबचा वर्षाव करून शत्रूने जालपिटे हे गाव बेचिराख केले. तेथून पुढे प्लाया लार्गाकडे जाण्याचा रस्ता होता; म्हणून संध्याकाळी फिडेलने तेथे लष्करी छावणी टाकली. परंतु रात्रीच्या काळोखात १५०० धंदेवाईक, प्रशिक्षित सैनिकांनी प्लाया लार्गा व प्लाया गिरन काबीज केले.

त्यामुळे त्यांना एक त्रिकोणी मोकळी जागा मिळाली आणि तेथून एका लहानशा टेकडीवर त्यांनी बंदुकांचे मोर्चे बांधले, रणगाडे लपविले आणि या मोक्याच्या ठिकाणावरून त्यांना चालून येणाऱ्या क्यूबन सैनिकांवर चारी बाजूंनी मारा करता येऊ लागला.

तरी क्रांतिकारकांची चढाई चालूच राहिली. पहाटे १ वाजल्यापासून आकाश लालभडक झाले होते. रात्रभर धुमश्चक्री होऊन २०-२२ वर्षांची तरुण मुले मृत्युमुखी पडली. अखेर १८ तारखेच्या सकाळी प्लाया लार्गा क्रांतिकारकांनी जिंकले आणि दुपारी त्यांनी प्लाया गिरनकडे मोर्चा वळविला.

या ठिकाणी शत्रूच्या फौजांनी भक्कम पाय रोवले होते. भरपूर आधुनिक शस्त्रसामग्रीसह सज्ज असलेल्या या फौजेला एखाद्या किल्ल्याच्या तटबंदीसारखी मारा करायला सोईस्कर जागा मिळालेली होती. त्यांच्या बंदुकांच्या माऱ्याला व आगीच्या ज्वाळांना तोंड देत पुढे सरकण्याखेरीज राष्ट्राचे स्वातंत्र्य कायम ठेवण्याचा दुसरा मार्ग फिडेलपुढे नव्हता. १९ तारखेला सकाळी देशभक्तांची ही फौज सर्व दिशांनी पुढे सरकू लागली. संध्याकाळी ५॥ वाजता शत्रूला जेरीस आणून शरण यायला लावल्यानंतर हा रणसंग्राम संपला.

ह्या आक्रमणाची तयारी करण्यासाठी अमेरिकन शासनाने किमान ८ कोटी डॉलर्स खर्च केले. प्रतिक्रांतिकारकांना सर्वतोपरी मदत करण्याचा अमेरिकेचा डाव जगभर प्रसिद्ध झाला आणि अमेरिकेची जगभर नाचक्की झाली.

क्यूबाच्या क्रांतिकारक फौजांनी ११७० आक्रमकांना कैद केले; ५ मोठे शेरमान रणगाडे, डझनावारी रिकाइलेस बंदुका, ८ प्रचंड तोफा, शेकडो मशिनगन्स व विमानवेधी तोफा, १० चिलखती रणगाडे ताब्यात घेतले. ४ युद्धनौका बुडविल्या आणि १२ बॉबफेकी विमाने पाडली.

क्यूबाच्या सरकारने १९६२ मध्ये युद्धकैद्यांवर खटले चालविले आणि त्यांना दीर्घ मुदतीच्या शिक्षा ठोठावल्या. त्यांच्यापैकी सुमारे ८०० निर्वासित पूर्वीचे जमीनदार, बँकमालक, व्यापारी व छापखान्यांचे मालक होते. ६५ जण पूर्वीच्या बातिस्टाच्या सैन्यातील होते. या सर्वांच्या सुटकेसाठी अमेरिकेने बोलणी सुरू केली. या युद्धात क्यूबाचे सुमारे ५ कोटी ३० लाख डॉलर्सचे आर्थिक नुकसान झाले होते. कैद्यांच्या सुटकेसाठी अमेरिकेला जवळजवळ ती सर्व रक्कम क्यूबाला द्यावी लागली.

संयुक्त राष्ट्र संघातही ४० देशांनी अमेरिकेचा या उघड आक्रमणाबद्दल धिक्कार केला.

अमेरिकेचा पराभव झाला, क्यूबाचे स्वातंत्र्य अबाधित राहिले, क्यूबन लोकांच्या शौर्याचे पोवाडे दक्षिण अमेरिकेत व सर्व शांततावादी देशांत गायिले जाऊ लागले. परंतु अमेरिका यापासून कोणताच धडा शिकली नाही. पुढे व्हिएतनाममध्ये आक्रमण करून अमेरिकेने पुन्हा एकदा दिवाळे काढले !

फिडेल मात्र या आक्रमणापासून फार मोठा धडा शिकला आणि तो अमेरिकेला महागात पडला !

१ जानेवारी १९५९ रोजी क्यूबात फिडेलच्या नेतृत्वाखाली स्वतंत्र, क्रांतिकारक सरकार स्थापन झाल्यापासून अमेरिकन शासनाने त्याला हरप्रकारे छळले होते. क्यूबातील चोर-दरोडेखोर व काही प्रतिक्रांतिकारक यांना हाताशी धरून ठिकठिकाणी लहान लहान बंडे करविली होती. घातपाती कृत्ये घडविली होती, विमानांनी बॉम्ब टाकून निष्पाप नागरिकांना ठार मारले होते, निंदानालस्तीची पत्रके तर विमानातून सतत टाकण्यात येत होती. धंदेवाईक मारेकरी घालून क्यूबाच्या नेत्यांना ठार मारण्याचे अनेक प्रयत्न केले होते.

आता ' बे ऑफ पिग्ज 'च्या आक्रमणानंतर अमेरिकेचे पुढचे पाऊल फिडेलला स्पष्ट दिसू लागले. आता अमेरिकेच्या युद्धनौका येतील, विनाशिका येतील, विमानांचे ताफे येतील आणि अमेरिकन सैनिकही देशात धुमाकूळ घालतील, याबद्दल त्याला संशय राहिला नाही.

अमेरिकेने आर्थिक नाकेबंदी करून क्यूबाची अर्थव्यवस्था मोडकळीस आणली. साखरेची आयात अजिबात बंद केली, तंत्रज्ञ काढून घेतले आणि दक्षिण अमेरिकेतील सर्व राष्ट्रांपासून क्यूबाला अलग पाडले; त्या वेळेपासूनच सोविएत युनियनबरोबर फिडेलने मैत्रीचे संबंध प्रस्थापित करायला सुरुवात केली होती. क्यूबाची साखर सोविएत युनियन खरेदी करीत होते. साखर कारखान्यांसाठी तंत्रज्ञांची मदतही देत होते. परंतु अद्याप कॅस्ट्रोने

संरक्षणासाठी मोठी मदत अगर शस्त्रास्त्रे मात्र समाजवादी देशांकडून घेतली नव्हती. यापुढे हे धोरण मूलभूतपणे बदलून अमेरिका आपल्याला नामशेष करणार नाही अशी व्यवस्था करण्याचा कॅस्ट्रोने निर्धार केला.

सोविएत युनियनचे पंतप्रधान निकिता ख्रुश्चेव व क्यूबन सरकार यांनी क्यूबामध्ये अणुअस्त्रधारी अग्निबाण प्रक्षेपणाचे तळ उभारण्याचा करार केला. क्यूबाचे संरक्षणमंत्री राऊल कॅस्ट्रो यांनी १९६२ च्या जुलैमध्ये मॉस्कोला भेट दिली; त्यावेळी ही बोलणी झाली असावीत. करार अर्थातच अत्यंत गुप्त होता.

परंतु क्यूबा अण्वस्त्र-तळ उभारीत आहे, अशा बातम्या व अफवा अमेरिकेत पसरल्या. अमेरिकेचे अध्यक्ष केनेडी यांनी याबद्दल माहिती देण्याचे हुकूम गुप्तहेर संघटनेला व संरक्षण खात्याला दिले. ऑक्टोबर-मध्ये अमेरिकेच्या टेहळणी विमानांनी हजारो छायाचित्रे केनेडींना सादर केली आणि ती पाहून ते पार हादरून गेले. रशियन तंत्रज्ञांनी क्यूबाच्या उत्तर व पश्चिम किनाऱ्यावर चार प्रचंड अण्वस्त्र-तळ उभारले होते, आणखी सहा तळ उभारण्याची तयारी चालू होती. सबंध क्यूबाचे द्वीपकल्प म्हणजे अमेरिकेकडे तोंड करून उभ्या असलेल्या अण्वस्त्रांचा प्रचंड तळच बनल्याचे छायाचित्रात दिसत होते. या अग्निबाणांचा पल्ला सुमारे २५०० मैल होता. अमेरिकेच्या दक्षिण टोकापासून केवळ ९० किलोमीटर्सवर असलेल्या क्यूबाच्या आवाक्यात संपूर्ण अमेरिकेचा विध्वंस करण्याची ताकद आली होती.

ही बातमी पसरताच अमेरिकेत भयानक घबराट पसरली. सर्व सैनिकांना आपापल्या जागी हजर होण्याचे हुकूम सुटले. शहरात सर्वत्र भुयारे खणली जाऊ लागली. लोकांनी बंदुका व खाद्यपदार्थ यांचा साठा करून अमेरिकेत वस्तूंचा तुटवडा निर्माण केला.

दुसऱ्या महायुद्धाच्या अखेरीस, नव्यानेच तयार केलेले अणुबॉंब चाचणी घेण्यासाठी, जपानमधील हिरोशिमा व नागासाकी या शहरांवर अमेरिकेने टाकले होते. त्याने केलेला विध्वंस व त्याच्या परिणामी लोकांनी भोगलेल्या यमयातना अमेरिकेतील लोकांना चांगल्या माहीत होत्या. त्यामुळे अणुयुद्ध आपल्या दारापाशी आल्याचे पाहताच त्यांच्या तोंडचे पाणी पळाले. सगळ्या जगातच तणाव निर्माण झाला.

क्यूबातील अणुसंभार आणखी वाढू न देण्याची उपाययोजना म्हणून अमेरिकन नौदलाने क्यूबापासून आठशे मैलांच्या अंतरावर युद्धनौकांची साखळी केली. रशियाकडून एकही जहाज क्यूबाकडे सरकू शकणार नाही, असा बंदोबस्त केला. एवढेच नव्हे तर क्यूबाच्या जवळच असलेल्या फ्लोरिडाच्या किनाऱ्यावर सैन्याची प्रचंड जमवाजमव केली.

प्रश्न संयुक्त राष्ट्रसंघटनेत गेला. तेथे उलटसुलट चर्चा झाली. रशियाला कोणत्याही परिस्थितीत अणुयुद्ध नकोच होते. क्यूबातील अमेरिकन कारवायांविरुद्ध सर्व राष्ट्रांत पुरेसे जनमत तयार झाले होते. संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या देखरेखीखाली क्यूबातील अणुतळ हलविण्याचे रशियाने मान्य केले. जगाने सुटकेचा निःश्वास सोडला. आणि १३ दिवसांचा जीवघेणा तणाव नष्ट झाला.

या निर्णयाच्या बदल्यात अमेरिकेने क्यूबाच्या अंतर्गत व्यवहारात हस्तक्षेप न करण्याचे आणि क्यूबाच्या सार्वभौमत्वाचा मान राखण्याचे आश्वासन दिले. इतकेच नव्हे तर रशियाभोवती अमेरिका उभारीत असलेली अण्वस्त्रतळांची साखळी काही प्रमाणात ढिली करण्याचे मान्य केले. २८ ऑक्टोबरला ह्या भयावह घटना

थांबल्यानंतर, केनेडींनी तावडतोब तुर्कस्तानमधील अणुअस्त्रे काढून घेण्याबद्दलचा आदेश दिला. १९६३ च्या एप्रिलपर्यंत तुर्कस्तानमधील सर्व अणुप्रक्षेपणास्त्रे व अस्त्रे काढून घेण्यात आली.

रशियाने सामर्थ्य, स्वातंत्र्यप्रेम व शांतताप्रेम पुन्हा एकदा जगाच्या निदर्शनास आणले. आणि क्यूबाला क्रांतीच्या विजयानंतर प्रथमच स्वास्थ्य व स्थैर्य प्राप्त करून घेण्याची संधी मिळाली.

९. उज्ज्वल भविष्याकडे वाटचाल

फिडेलचे व्यक्तिमत्त्व अत्यंत गतिमान आहे. त्याचा सतत विकास होत होता. आणि तो अशा वेगाने व अकल्पितपणे की सगळे जगच केवळ नव्हे; तर त्याचे अगदी जवळचे लोकही चकित होत.

फिडेल कम्युनिस्ट असल्याचा किंवा झाल्याचा गवगवा अमेरिकेत बरीच वर्षे चालू होता. त्याला फिडेलने कधीच उत्तर दिले नाही.

वास्तविक फिडेल प्रथमपासून कम्युनिस्ट मुळीच नव्हता, पण तो कम्युनिस्ट-विरोधीही नव्हता. तो होता स्वातंत्र्यप्रेमी व साम्राज्यशाहीविरोधी. क्यूबातील व एकूण दक्षिण अमेरिकेतील परिस्थितीमुळे तो अमेरिकन साम्राज्यवाद्यांच्या विरुद्ध होता, विरुद्ध लढला.

या लढ्याच्या काळात तो अपरिहार्यपणे एका विशिष्ट दिशेने वाटचाल करू लागला. परकीय आर्थिक वर्चस्व दूर सारण्यासाठी त्याला मालमत्तेचे राष्ट्रीयीकरण करावे लागले. क्यूबातील गरीब लोकांना संरक्षण देण्यासाठी

त्याने विजेचे दर कमी केले, घरभाडी ५० टक्क्यांनी कमी केली आणि घरमालकांची नाराजी ओढवून घेतली. भ्रष्टाचार व लाचलुचपत बंद पाडण्यासाठी त्याने क्यूबाच्या कम्युनिस्टांना शासनात स्थान देऊन पूर्वी राज्यकारभारात पुढाकाराने असणाऱ्या तंत्रज्ञ, व्यापारी, बँकांचे व इतर वित्तव्यवसायातील चालक यांचा असहकार ओढवून घेतला. त्याच्या धोरणाची दिशा भांडवलशाहीच्या विकासाची नव्हती, समाजवादाकडे जाणारी होती.

या परिस्थितीच्या दणक्याखाली आणि बे ऑफ पिग्जच्या आक्रमणानंतर फिडेल एकदम सजग झाला.

अमेरिकेने कडक आर्थिक कोंडी केल्यामुळे क्यूबा संपूर्ण पश्चिम गोलार्धात अलग पडला होता आणि समाजवादी राष्ट्रांचेच सहकार्य विचारसमानतेमुळे व व्यावहारिक कार्यक्रमांच्या सहधर्मामुळे आपल्याला हात देणार आहे, हे फिडेलला स्पष्ट दिसू लागले होते.

आपला वैचारिक व व्यावहारिक एकाकीपणा समाप्त करणं हाच त्याला पुढील प्रगतीचा आशादीप वाटू लागणं मुळीच नवलाचं नव्हतं.

आणि तरीही १९६१ च्या डिसेंबरमध्ये आकाशवाणीवरील भाषणात "मी मार्क्सवादी-लेनिनवादी आहे, आणि जीवनाच्या अंतापर्यंत मार्क्सवादी-लेनिनवादीच राहीन" अशी त्याने घोषणा केली, तेव्हा जगातीलच नव्हे, तर क्यूबातील लोकांनाही खूप नवल वाटले.

त्यानंतर समाजवादाच्या दिशेने फिडेलची पावलं निश्चितपणे व जोमाने पडू लागली. समाजवादी कार्यक्रम यशस्वीरीतीने अंमलात आणण्यासाठी त्यावर निष्ठा असलेला शिस्तबद्ध पक्ष देशात असावा लागतो हे

फिडेलच्या विचारात रुजलं आणि त्याने तशी पावलं टाकायला सुरुवात केली. क्यूबातील कम्युनिस्ट पक्षाबरोबर चर्चा व बोलणी करून त्या पक्षाचे कार्यकर्ते, सव्वीस जुलै आंदोलनाची संघटना व इतर जहाल क्रांतिकारकांना एकत्र आणून त्याने १९६१ मध्ये 'संयुक्त क्रांतिकारी संघटना' स्थापन केली. तिच्यात आणखी परिवर्तन होऊन १९६३ मध्ये 'समाजवादी क्रांतीचा संयुक्त पक्ष' असे नाव त्याने धारण केले. १९६५ मध्ये या पक्षाला रीतसरपणे 'क्यूबाचा कम्युनिस्ट पक्ष' हे नाव देण्यात आले. फिडेल कॅस्ट्रो क्यूबाच्या कम्युनिस्ट पक्षाचा जनरल सेक्रेटरी असून तो क्यूबातील शासनकर्ता पक्ष आहे. त्याच्या मार्गदर्शनाखाली क्यूबातील राजकारण व अर्थकारण यांची प्रगती चालू आहे.

१९६२ च्या अखेरीस अणुअस्त्र प्रक्षेपणांचे अरिष्ट टळल्यानंतर अमेरिकेचा उपद्रव थोडा कमी झाला. थोडी स्थिरस्थावर होत असतानाच क्यूबावर एक फार मोठं नैसर्गिक संकट आले. देशाच्या इतिहासातील सर्वांत भीषण व विध्वंसकारी असे चक्रीवादळ आले आणि त्याने विलक्षण हैदोस घातला. पूर्व क्यूबात शेकडो माणसे मृत्युमुखी पडली, ६० लक्ष गुरांपैकी १० लक्ष मेली, भरास आलेला ऊस चिखलास मिळाला, संपूर्ण कॉफीचे उत्पादन धुळीला मिळाले. मध्य क्यूबातील तीन नद्यांना पूर आले, आणि त्यांनी प्रचंड विस्ताराचा प्रदेश जलमय केला. ह्या आपत्तीने क्यूबाची आर्थिक प्रगती एकदम हादरून गेली. पण फिडेलने हातपाय गाळले नाहीत, तो क्यूबाच्या पुनर्रचनेच्या योजना आखण्याच्या आणि त्या अंमलात आणण्याच्या कामाला लागला.

वास्तविकपणे क्रांतीनंतरच्या पहिल्या ८-१० वर्षांच्या काळात क्यूबात आर्थिक-सामाजिक क्रांती घडवून आणण्याचे फिडेलचे स्वप्न साकारण्यासारखी स्थितीही नव्हती. क्यूबाच्या स्वातंत्र्याचे संरक्षण हेच मुख्य कार्य देशापुढे होते. त्यासाठी ३ लाखांहून अधिक लोकांना सतत शस्त्रसज्ज ठेवावं लागत होते. स्वातंत्र्य

भर म्हणजे, नवीन प्रकारच्या कामासाठी व प्रशिक्षणासाठी तरुण मंडळी गुंतल्यामुळे बेकारांची फौज एकदम गेड झाली आणि त्या काळात ऊसकापणीचे काम शारीरिक बळावर करणे भाग पडत असल्यामुळे नुकसान अधिकच झाले.

परंतु अगदी या काळातही क्यूबाला भेट देऊन गेलेल्या अमेरिकन पत्रकारांनीही फिडेलची वाहवाच केली आहे.

कारण क्यूबातील कार्याचा अग्रक्रम फिडेलच्या व त्याच्या सहकाऱ्यांच्या दृष्टीसमोर होता. 'क्रांतीसाठी क्रांती' अशी भ्रामक कल्पना त्या देशभक्तांच्या मनातही नव्हती. शेती-सुधारणा व उद्योगधंद्यांचा विकास हा राष्ट्र-उन्नतीचा कार्यक्रम त्यांच्या नजरेसमोर होता. तो यशस्वी केला तरच लोकांचे जीवन सतत सुधारता येईल हे उद्दिष्ट ठामपणे त्यांच्या योजनांच्या गाभ्यात होते.

परंतु अनेक शतके हलाखीत राहिलेल्या, अज्ञानात राहिलेल्या, पण देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात सहभागी झालेल्या जनतेला तावडतोब काही सुखसोयी मिळवून देणे, हेही या क्रांतिकारकांना आपले कर्तव्य वाटत होते. त्यासाठी अगदी आर्थिक हलाखीच्या परिस्थितीतही काही कार्यक्रम पार पाडण्यात आले.

क्यूबातील एकही व्यक्ती उपाशी राहणार नाही, याची खबरदारी घेतली गेली. तांदूळ, कडधान्ये, मांस, कोंबड्या, मासे, अंडी, दूध, बटाटे या वस्तू रेशनकार्डावर मिळू लागल्या. ७ वर्षांखालील प्रत्येक मुलाला पावशेर दूध मोफत देण्यात येऊ लागले. शाळा-कॉलेजातील हजारो मुलांना विनामूल्य अगर स्वस्त जेवण

पुरविले जाऊ लागले. हजारो कर्मचाऱ्यांना व शेतात काम करणाऱ्यांना दुपारचे पोटभर जेवण याच पद्धतीने दिले जाऊ लागले.

वेश्याव्यवसायावर पूर्ण बंदी घालण्यात आली; जुगाराच्या रात्रकेंद्रांवर संपूर्ण नियंत्रण बसविण्यात आले. आणि सर्वांना काम देण्यात आले.

उपासमार बंद पाडण्याच्या कार्यक्रमानंतर दुसरा अग्रक्रम देण्याला आला तो शिक्षणाला. शिक्षण-क्षेत्रात क्रांतीनंतरच्या काळात क्यूबाने केलेली प्रगती अत्यंत मनोवेधक आहे. क्रांतिपूर्वकाळात क्यूबात १० लाख लोक पूर्ण निरक्षर व १० लाखांहून अधिक अर्धशिक्षित होते. ६ लक्ष मुलांना शाळा उपलब्ध नव्हत्या आणि १० हजार शिक्षक बेकार होते. शिक्षणखात्यात कमालीची लाचलुचपत होती. स्वतंत्र क्यूबाने हे चित्र बदल-ण्यासाठी निर्धाराने कार्य सुरू केले.

स्वराज्याच्या पहिल्या वर्षाच्या अखेरीसच, १९५९ च्या सप्टेंबरमध्ये क्रांतिकारी सरकारने देशभर १० हजार शिक्षणवर्ग सुरू केले. त्याच वर्षी डिसेंबरमध्ये सर्वांगीण शिक्षणसुधारणा कायदा संमत करण्यात आला आणि बातिस्टा राजवटीतील ६९ लष्करी छावण्यांचे शाळांत रूपांतर करण्यात आले.

१९६१ मध्ये प्रौढ शिक्षणाची मोहीम हातात घेण्यात आली. २ लक्ष ७० हजारांहून अधिक साक्षर लोकांनी तिच्यात भाग घेतला आणि त्यांनी ७ लक्ष ७ हजार प्रौढ स्त्री-पुरुषांना लिहायला-वाचायला शिकविले. १९६१ च्या डिसेंबरमध्ये संयुक्त राष्ट्रसंघाच्या सांस्कृतिक विभागाच्या प्रतिनिधींसमोर, ' निरक्षरता दूर करणारा लॅटिन अमेरिकेतील पहिला देश ', असा क्यूबाचा गौरव करण्यात आला.

हे कार्य सतत पुढे चालू राहील आणि क्यूबात एकही नवीन निरक्षर निर्माण होणार नाही, यासाठी योजना करण्यात आली. तसेच शेतकरी-कामगारांसाठी माध्यमिक शिक्षणाची आणि कामगारांच्या माध्यमिक शाळा उच्च शिक्षणसंस्थांना जोडण्याची सोय करण्यात आली.

१९६२ च्या जूनमध्ये शिक्षण सार्वजनिक क्षेत्रात समाविष्ट करण्याचा कायदा करण्यात आला आणि सर्व खाजगी शिक्षणसंस्था शासनाने हाती घेतल्या. शिक्षण मोफत करण्यात आले; यात सर्व स्तरावरील शिक्षणाचा समावेश आहे.

व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण व रोजगार यांची सांगड घालण्यासाठी ग्रामीण भागात प्रायोगिक प्रकल्प सुरू करण्यात आले. त्यातील यश दृष्टीस पडताच, क्यूबातील संपूर्ण शिक्षण-व्यवस्थेत कार्याधिष्ठित शिक्षणाची प्रथा रूढ करण्यात आली आहे. आता पदवीधर विद्यार्थ्यांची संख्या सतत वाढत असून तेथे परदेशातील विद्यार्थीही शिष्यवृत्त्या घेऊन शिक्षण घेत आहेत. वैद्यकीय शिक्षणाची आणि औषधांच्या उत्पादनाचीही मोठ्या वेगाने प्रगती करण्यात येत आहे.

क्रांतिपूर्वकाळात हजारो लोक विशेषतः लहान मुले जवळपास दवाखान्यांची सोय नसल्यामुळे मृत्युमुखी पडत असत. ही स्थिती बदलण्यासाठीही तातडतोबीने कार्यक्रम आखण्यात आले. १९६६ पूर्वीच क्यूबामध्ये क्षयरोग व पोलिओ यांना आळा घालण्यात आला, आणि अन्नाअभावी, विशेषतः दुधाचा थेंबही मिळण्याच्या शक्यतेच्या अभावी—लहान मुलांना होणारे हगवण वगैरे पोटाचे विकार पूर्णपणे निपटून काढण्यात आले.

लोकांची परिस्थिती सुधारण्याचा आणि त्यांचे जीवनमान उंचावण्याचा एकमेव मार्ग म्हणजे

अर्थातच शेती व उद्योगधंदे यांचा विकास होय. हा पाया कसा मजबूत करण्यात आला आणि उत्पादनाची वाढ कशी होत गेली, याचा फक्त धावता आढावा या ठिकाणी घेतला आहे. शेती व उद्योगधंद्यांतील मूलभूत सुधारणांमुळे या दोन्ही क्षेत्रांत आणि एकूण राष्ट्रीय उत्पादनात झालेल्या तौलनिक वाढीची अधिक माहिती, जिज्ञासू विद्यार्थ्यांनी अधिक अभ्यास करून मिळवली पाहिजे.

मागे उल्लेख केल्याप्रमाणे १९५९ च्या मेमध्ये पहिला 'शेतीसुधारणा' कायदा जारी करण्यात आला. त्यानुसार देशी व परदेशी दोन्ही प्रकारच्या मोठ्या जमीनमालकीवर बंदी घालण्यात आली; सर्व वरकड जमीन ताब्यात घेऊन सरकारने ती शेतकऱ्यांना वाटली.

१९६३ च्या ऑक्टोबरमध्ये नवीन शेती-सुधारणा कायदा करण्यात आला, आणि ६७ हेक्टर जमीन ही खाजगी-मालकीची कमाल मर्यादा ठरविण्यात आली. त्यामुळे मोकळी झालेली जमीन राष्ट्रीय मालकीची करण्यात आली. आता फक्त जमीन कसणारा शेतकरीच जमिनीचा मालक राहिला. सर्व पिकाखालील जमिनीच्या फक्त ३० टक्क्यांइतकीच जमीन अशा रीतीने खाजगी मालकीची राहिली. क्यूबाच्या जमिनीवरील परकीयांची मालकी पूर्णपणे नष्ट झाली.

उद्योगधंद्यांच्या क्षेत्रातही असेच मूलभूत बदल घडविण्यात आले. १९६० मध्ये सर्व महत्त्वाच्या अमेरिकन कंपन्या (बहुराष्ट्रीय उद्योग कंपन्या) राष्ट्राच्या मालकीच्या करण्यात आल्या. आणि नंतर अमेरिकन भांडवलाने चालणाऱ्या सर्व बँका सरकारने ताब्यात घेतल्या. १९६० च्या अखेरीस सर्वच परकीय व क्यूबन बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले व ३८२ मोठे क्यूबन उद्योगधंदेही सरकारने ताब्यात घेतले. १९६८ पर्यंत क्यूबातील सर्वच उत्पादक धंदे खाजगी मालकीतून काढून घेण्यात आले.

या सर्व कृतींमुळे योजनाबद्ध रीतीने व शास्त्रीय पायावर अर्थरचनेची उभारणी करण्याचे कार्य क्यूबामध्ये पूर्ण झाले. यानंतरच्या काळात क्यूबाने १९७०-१९७५, १९७५-१९८० आणि १९८०-१९८५ अशा तीन पंचवार्षिक योजना आखल्या आणि मोठ्या उत्साहाने पार पाडल्या. या योजनांमुळे ऊस, कॉफी, कोको, तंबाखू, तांदूळ, मंत्र-मुसुंबी-लिंबे आदि फळे अशा शेती-औद्योगिक पिकांची विविधता व उत्पादन वाढले. लोखंड, पोलाद, निकेल या मूलभूत धातू उत्पादनाला व्यवस्थित स्वरूप देऊन 'इंजिनिअरिंग उद्योगधंदे' सुरू करण्यात आले. यंत्रोत्पादक यंत्र बनविण्यात येऊ लागली आणि शेतीसाठी ट्रॅक्टर्स, शेतकापणी यंत्रे वगैरे मोठ्या प्रमाणावर तयार होऊ लागली; त्यामुळे शेती करणाऱ्यांचे शारीरिक कष्ट तर दूर झालेच; परंतु फार मोठ्या प्रमाणावर इतर कार्यासाठी मनुष्यबळ उपलब्ध झाले आणि देशाचे रंगरूप पालटू लागले.

सामान्य लोकांच्या जीवनात झालेले बदल तर स्वप्नवत वाटण्याइतके मोठे आहेत; सकस अन्न, रेडिओ, टी. व्ही., क्रीडा यांसारखी करमणुकीची साधने, राहती घरे, सुखकर प्रवास, मनपसंत शिक्षण व प्रगतीची विस्तारलेली क्षितिजे यामुळे क्यूबातील लोकांत नवा आत्मविश्वास व चैतन्य निर्माण झाले आहे.

क्रांतीने घडवून आणलेल्या परिवर्तनात महिलांच्या जीवनाचा न विसरता उल्लेख केला पाहिजे. क्रांतिपूर्वकाळात स्त्रिया फक्त हलक्या दर्जाची व श्रमाची कामे करीत. त्या घरातील मोलकरणी, अगर शेतावरच्या कामकरी होत्या; शहरातील कचेऱ्यांतून कारकून होत्या. मध्यमवर्गीय व उच्चवर्गीय स्त्रिया कधीच अर्थार्जन करीत नव्हत्या. आता महिला सर्वत्र वावरताना दिसतात. नर्सेस, प्रयोगशाळा व औषधी प्रयोगशाळा, शिक्षिका, डॉक्टर्स, कचेऱ्यांतील जबाबदाऱ्यांच्या जागा—आदि महत्त्वाच्या ठिकाणी त्यांना वाव मिळत आहे. त्यांच्या कामाच्या वेळात त्यांच्या मुलांची व्यवस्थित काळजी घेतली जाते आणि त्या मोकळेपणाने आपल्या कामात मग्न होऊ शकतात. स्त्रिया

म्हणजे मद्यालयातील सेविका, नाईट क्लबातील अर्धनग्न नर्तिका, वेश्या ही व्याख्या जाऊन, क्यूबातील स्त्रियांना मानाचे जीवन क्रांतीने मिळवून दिले आहे.

या परिस्थितीमुळेच, १९७५ मध्ये हवाना येथे भरलेल्या क्यूबाच्या कम्युनिस्ट पक्षाच्या पहिल्या परिषदेत कॅस्ट्रोने मोठ्या मोकळ्या मनाने सांगितले :

"क्यूबात आज बेकारी नाही, वंशभेद नाही, उपासमार नाही, हालअपेष्टा नाहीत, जुगार, वेश्या-व्यवसाय व व्यसनाधीनता नाही, निरक्षरता व शाळेत न जाऊ शकणारी अनवाणी मुले नाहीत, दरिद्री विभाग किंवा उपेक्षित आजारी माणसे नाहीत, आमची शिक्षण पद्धती व आरोग्यसेवा सामाजिक विभागातील आमच्या यशाचे आलेख आहेत, आणि जगभरच्या अनेक देशांनी त्यांचे कौतुक केले आहे; हे सांगताना आम्हाला अभिमान वाटतो."

फिडेलच्या या निवेदनातील शब्दन् शब्द खरा आहे, हा क्यूबाच्या नियोजनाच्या यशाचा बोलका पुरावा आहे. पुढील काळातही आर्थिक-सामाजिक-सांस्कृतिक क्षेत्रात क्यूबाची प्रगती वाढत्या वेगाने चालू राहिली आणि आता सन २००० पर्यंत काय काय झाले पाहिजे याची राष्ट्रव्यापी चर्चा सर्व लोकांत व मंडळांतून चालू आहे. क्यूबात महिला, विद्यार्थी, तरुण, कामगार, शेतकरी, शास्त्रज्ञ, कलावंत इ. सर्वांच्या अत्यंत कार्यक्षम व सामर्थ्यशाली संघटना असून त्या राष्ट्राच्या विकासाच्या प्रश्नात फार आपुलकीने व आत्मीयतेने भाग घेतात.

१९८१-८५ च्या तिसऱ्या योजना काळात दुसऱ्या योजना काळापेक्षा एकूण राष्ट्रीय उत्पन्न, त्याचे लक्ष्य ५ टक्के वाढीचे असताना, ७'३ टक्क्यांनी वाढले; वैयक्तिक उपभोग २'८ टक्क्यांनी व सामाजिक सुखसोयी ७'१ टक्क्यांनी वाढल्या. सरासरी वेतन २६'४ टक्के वाढले.

साखरेचे उत्पादन १२.२ टक्क्यांनी वाढले आणि ६० टक्क्यांहून अधिक ऊसकापणी यंत्रांच्या साहाय्याने होऊ लागली. औद्योगिक क्षेत्रातील बांधणी ४५ टक्क्यांनी वाढली आणि शेकडो नवे कारखाने सुरू करण्यात आले. असाच विकास पोलाद, वीज, इलेक्ट्रॉनिक्स, मासळी उद्योग, परदेशी व्यापार व पर्यटन या क्षेत्रांत झाला.

अर्थात हे यश सहजासहजी मिळाले नाही. सुरुवातीला (पहिल्या योजना काळात) अनुभव नसताना झालेल्या चुका दुरुस्त कराव्या लागत होत्या. चक्रीवादळासारख्या नैसर्गिक आपत्तींना तोंड द्यावे लागले. आणि मुख्य म्हणजे अमेरिकेच्या आर्थिक कोंडीमुळे आयात-निर्यात व्यापार व एकूण सर्वच आर्थिक उलाढाली दूरच्या देशांबरोबर कराव्या लागत असल्यामुळे अनावश्यक खर्चात वाढ होत राहते; ती सतत भरून काढून पुढे जावे लागले.

इतके सर्व असले तरी क्यूबातील बदल आश्चर्यकारकच आहेत, यात काय संशय? फिडेल कॅस्ट्रोने वर उल्लेखिलेल्या ज्या गोष्टी मोठ्या अभिमानाने सांगितल्या त्या इतर कोणत्याच दक्षिण अमेरिकेतील देशात घडलेल्या नाहीत; किंबहुना आशिया व आफ्रिका खंडातील ज्या देशांनी क्यूबाच्या कितीतरी वर्षे आधी स्वातंत्र्य मिळविले त्यांनी तरी प्रगतीचा असा भक्कम पाया घालून, पुढील यशाचा मार्ग मोकळा करून घेतला आहे का? मुळीच नाही. त्याला आपला भारतही अपवाद नाही, हे तुमच्या ध्यानात आलेच असेल! अर्थात, या खंडातील समाजवादी पद्धतीने विकास करणारे देश त्याला अपवाद आहेत, ती गोष्ट निराळी.

क्यूबाच्या प्रगतीपथावरील या वाटचालीतील आणखी फक्त एकाच क्षेत्राचा ओझरता आढावा घेणे आता आपल्याला जमणार आहे. क्यूबाचे परराष्ट्रीय धोरणही त्याच्या स्वातंत्र्याला व सार्वभौमत्वाला शोभणारेच आहे.

१९६१ मध्ये भारताचे पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांच्या प्रेरणेने बेलग्रेड येथे अलिप्त देशांची पहिली परिषद झाली. निरनिराळ्या देशांचे परस्परांबरोबरचे संबंध कोणत्या तत्त्वावर आधारित असावेत, या प्रश्नावर या परिषदेत मुख्यतः भर देण्यात आला होता. परस्परांचे स्वातंत्र्य व सार्वभौमत्व यांचा आदर करावा, तंट्याचे प्रश्न शस्त्रबलाचा वापर न करता वाटाघाटीने सोडवावेत आणि जगात पुन्हा युद्ध होऊ नये, शांतता रहावी यासाठी आशिया–आफ्रिका व दक्षिण अमेरिकेतील नवस्वतंत्र राष्ट्रांनी सतत दक्ष राहून, प्रयत्नशील रहावे इत्यादि तत्त्वे त्या परिषदेने पुढे मांडली. जाहीरनाम्यातील या तत्त्वांना मानणाऱ्या २५ राष्ट्रांनी परिषदेला प्रतिनिधी पाठविले; त्यात क्यूबाचाही प्रतिनिधी होता. आज १०० हून अधिक राष्ट्रे आणि जगातील दोनतृतीयांशाहून अधिक लोक या अलिप्त राष्ट्रांच्या आंदोलनात सहभागी झालेले आहेत. या आंदोलनाचा एक संस्थापक सभासद असलेल्या क्यूबाने त्याची शक्ती व व्याप्ती वाढविण्यासाठी खूप साहाय्य केले. आणि म्हणूनच १९७९ मध्ये ६ वी परिषद हवाना येथे भरली आणि अलिप्त राष्ट्र संघटनेच्या अध्यक्षस्थानी फिडेल कॅस्ट्रोची मोठ्या गौरवाने नियुक्ती झाली.

आता दक्षिण आफ्रिकेतील गोऱ्या लष्करी राजवटीविरुद्धचा लढा हा या आंदोलनाचा प्रमुख कार्यक्रम बनला आहे. या लढ्याला फिडेल कॅस्ट्रोने फार पूर्वीपासून महत्त्व दिले आहे. क्यूबाप्रमाणेच दक्षिण अमेरिकेतील

व आफ्रिकेतील जे जे देश साम्राज्यवाद्यांपासून स्वातंत्र्य मिळावे म्हणून लढत आहेत, किंवा साम्राज्यवादी हस्तक्षेप व आक्रमणे यांविरुद्ध लढत आहेत, त्यांना मदत करणे हे आपले आंतरराष्ट्रीय कर्तव्य आहे, असे क्यूबा मानतो. आणि म्हणूनच अंगोलाच्या स्वातंत्र्ययोद्ध्यांचा जय होण्याचा क्षण जवळ आलेला पाहताच दक्षिण आफ्रिकेतील वंशवादी लष्करी राजवटीने अंगोलावर आक्रमण केले तेव्हा अंगोला मुक्तिसेनेच्या सरकारने विनंती करताच क्यूबाने आपले आंतरराष्ट्रीय सेनादल १९७६ मध्ये तेथे पाठविले आणि अंगोलाच्या स्वातंत्र्याचे रक्षण केले. इथोपियाच्या स्वातंत्र्यालाही क्यूबाने अशीच मदत केली. कोणत्याही देशाचे स्वातंत्र्य चिरडण्यासाठी साम्राज्यवादी आक्रमणे करतात, तेव्हा स्वातंत्र्यलढ्याचे रक्षण करण्यासाठी क्यूबाचे सैनिक लढले तर ते योग्यच आहे, असे क्यूबाने आंतरराष्ट्रीय धोरण ठरविले आहे.

अशा रीतीने, अंतर्गत कारभारात समाजवाद व प्रगती आणि आंतरराष्ट्रीय धोरणात सोविएत युनियन व इतर समाजवादी राष्ट्रांबरोबर सहकार्य, अलिप्त राष्ट्र संघटनेत शांतता व सार्वभौमत्व यांच्यासाठी सहभाग व पुढाकार आणि आफ्रिका व दक्षिण अमेरिकेतील स्वातंत्र्यलढ्यांना सक्रिय मदत, असा अत्यंत पुरोगामी कार्यक्रम घेऊन छोटासा क्यूबा हा जगात मान्यता व सन्मान पावला आहे. त्याची अशीच भरधाव दौड चालत रहावी ही आपली सर्वांचीच इच्छा आहे. फिडेल कॅस्ट्रो म्हणतो : "आम्ही उज्ज्वल भविष्याकडे वाटचाल करीत आहोत." तसेच घडावे व घडेल असा विश्वास सर्वांनाच वाटतो.

१०. फिडेलचे व्यक्तिमत्त्व आणि त्याचे प्रियजन

फिडेलच्या राजकीय, आर्थिक व सामाजिक क्रांतीचा आपण परिचय करून घेतला. फिडेल घडवीत असलेल्या बदलत्या क्यूबाचेही आपण ओझरते दर्शन घेतले. आणि फिडेलबद्दल आपल्याला स्वाभाविकपणेच खूप उत्सुकता वाटते.

तो व्यक्ती म्हणून कसा आहे ? त्याचा स्वभाव कसा आहे ? त्याच्या आवडीनिवडी काय आहेत ? त्याची मित्रमंडळी व प्रिय मंडळी कोण आहेत ? हे व असे अनेक प्रश्न आपल्या मनात येतात आणि त्यापैकी काहींची उत्तरे आपण जरूर मिळवू या.

फिडेलला आपले शरीर निरोगी व ताकदवान ठेवायला फार आवडते. त्यासाठी तो खूप काम करतो. आठवड्यातील सातही दिवस सरासरीने दररोज १८ तास काम करतो. पुढारी या नात्याने त्याला सर्वच प्रकारचे काम करावे लागते, आणि त्यात स्वाभाविकपणेच शासकीय कचेऱ्यांतील कामाचा मोठाच वाटा असतो. पण त्याला बाहेरचे काम अधिक आवडते. कारखान्यांत, औद्योगिक शेतीकेंद्रांत व शेतांवर तो अधिक रमतो. बालपणापासून मळ्यांवर वाढल्यामुळे त्याला निसर्ग अत्यंत प्रिय आहे आणि ग्रामीण भागात तो अगदी हरखून जातो. दर हंगामात निदान दोन आठवडे तो ऊसकापणीचे काम करतो, आपल्या समवेत राष्ट्राध्यक्ष व इतर मंत्र्यांनाही घेतो.

क्यूबातील सर्वच लोक मुत्सद्यांपासून विद्यार्थ्यांपर्यंत सर्वजण ऊसमळ्यांत व इतरत्र काम करतात. फिडेलला सर्वांच्यात मिसळायला खूप आवडते. क्यूबातील लोकांना अर्थातच त्याच्याबद्दल खूप आदर आहे, पण त्यापेक्षा आपलेपणा व प्रेम अधिक आहे. सर्वजण त्याच्याशी मोकळेपणाने बोलतात, अडीअडचणी व तक्रारी मांगतात, इच्छा व महत्त्वाकांक्षा बोलून दाखवितात. त्यापासून तो खूप शिकतो. क्यूबातील जवळ जवळ सर्वच लोकांनी फिडेलला अगदी जवळून पाहिले आहे आणि त्याच्या सहवासाचा आनंद लुटला आहे.

फिडेल खूप साधा आहे. कपड्यांची अगर छानछोकीची त्याला आवड नाही. त्याचे कपडे वगैरे त्याची सहकारी मंडळीच पाहतात, आणि पाश्चिमात्य समाजातील उच्चभ्रूंना तो गबाळा वाटतो. इतका तो त्या बाबतीत बेफिकीर असतो.

सिएरा मेस्त्राच्या काळात पाणी व साबण वगैरे नसल्यामुळे त्याने व इतर सर्व क्रांतिकारकांनी दाढी-मिश्या वाढविल्या; तशीच केशभूषा त्याने आताही कायम ठेवली आहे. आणि ती सर्व दक्षिण व मध्य अमेरिकेत इतकी लोकप्रिय झाली आहे की पुरोगामी म्हणविणारे सर्व लेखक-कलावंत व क्रांतिकारक लढवय्ये दाढी-मिश्या ठेवणे हे भूषणावह मानतात, ती एक काही दशके फॅशनच बनली होती.

त्याच्या साधेपणाचेच आणखी एक अंग म्हणजे त्याला पैशांचा लोभ मुळीसुद्धा नाही. त्याच्या स्वतःजवळ कधी पैसेच नसतात, आणि त्याला लागतही नाहीत. तो बहुधा निरनिराळ्या अनेक निवाऱ्याच्या ठिकाणी रात्र काढतो आणि हवानात एका लहानशा घराच्या वरच्या मजल्यावर राहतो. कोणत्याही प्रकारचा डामडौल नसलेले, सोईस्कर फर्निचर असलेले असे त्याचे घर आहे. आपल्या नावावर त्याने कोठेही पैसा-संपत्ती

ठवलेली नाही. क्यूबाच्या इतिहासात ही घटना– 'अहो, नवल एक वर्तले' या सदरात मोडणारी आहे. क्यूबातील सार्वजनिक जीवनातील भ्रष्टाचार व लाचलुचपत नष्ट झाली, याला या त्यांच्या नेत्याचा आदर्शही कारणीभूत आहे, हे निश्चितच.

त्याला मद्यपान करायला आवडत नाही. तो औषधेही घेत नाही. भरपूर व मकम अन्न ग्रहण करून तो आपली शक्ती व उत्साह कायम टिकवितो.

कॅस्ट्रोच्या मनात कोणत्याही प्रकारचा वंशभेद, धर्मभेद किंबहुना राष्ट्रभेदही नाही. संपूर्ण दक्षिण अमेरिका त्याला आपल्या मातृभूमीप्रमाणेच जवळची वाटते; आणि त्या देशातील लोकांच्या चळवळी त्याला आपल्याच वाटतात. खरे म्हणजे क्यूबातील लोकही संमिश्र आहेत; मूळचे इंडियन्स स्पेनच्या पहिल्या १०० वर्षांच्या कारकीर्दीत जवळ जवळ नष्ट झाले असले तरी ते काही प्रमाणात आहेत; आणि बहुसंख्य लोक क्यूबाच्या बाहेरून आणण्यात आलेले आहेत; त्यात स्पॅनिश, नीग्रो व त्यांची संमिश्र प्रजा आहे. सामाजिक क्रांतीच्या प्रारंभीच्या काळात तरी सुधारणांचा फायदा सर्वांत अधिक नीग्रोंनाच मिळाला. कारण ते सर्वांत अधिक पीडित होते. परंतु त्यामुळे इतरांत असंतोष नाही. क्यूबातील आधीची सुशिक्षितांची पिढी क्रांतीनंतर देश सोडून गेल्यावर क्यूबा हे ३० वर्षांपेक्षा कमी वयाच्या तरुणांचे राष्ट्र बनले आणि फिडेलचे व्यक्तिमत्त्व, त्याची समानता व समाजवाद आणि द. अमेरिकेत अंगभूत असलेला आंतरराष्ट्रीय बाणा या सर्वांच्या आकर्षणाने ते एकसंध राहिले. आधुनिक जगात ही किमया करून दाखविणाऱ्या थोड्या राष्ट्रांपैकी क्यूबा आहे. हे गौरवास्पदच आहे.

फिडेल आपल्या खाजगी जीवनाबद्दल कधी बोलत नाही. खाजगी जीवनाचे हे पावित्र्य साधारणतः क्यूबन लोकांच्या परंपरेत बसणारे आहे. परंतु परदेशी पत्रकारांनी फिडेलबद्दलच्या अनेक चारित्र्यकथा छापल्या

आहेत. त्यात गुप्त असे काही नाहीच. आपल्यालाही त्याच्या जीवनआलेखाच्या दृष्टीने काही घटना माहीत करून घ्यायला हरकत नाही.

हवाना विद्यापीठात असताना त्याचे एका मुलीवर प्रेम बसले. मुलीचे वडील व भाऊ बाटिस्टाच्या सरकारी नोकरीत होते. तेव्हा दोघांनी १९४८ मध्ये लग्न केले. १९४९ च्या सप्टेंबरमध्ये त्यांना एक मुलगा झाला, त्याचे नाव फिडेलितो. मोंकाडा लष्करी छावणीवरील हल्ल्याच्या वेळी १९५३ मध्ये ते एकत्रच राहत होते; परंतु फिडेलला शिक्षा होऊन तो पाईन्स आयलंडवरील तुरुंगात असताना त्यांनी घटस्फोट घेतला. फिडेलचे मुलावर खूप प्रेम होते, परंतु काही वर्षे तो आईजवळ अमेरिकेत होता. क्रांतीच्या विजयोत्सवाच्या समारंभात तो फिडेलबरोबर हवानात होता. पुढे तो कोणत्याही सामान्य क्यूबन मुलांप्रमाणे शाळा-कॉलेजात शिकू लागला. इतक्या मोठ्या पुढाऱ्याचा मुलगा म्हणून त्याला कोणत्याही प्रकारच्या सवलती देण्यात येत नव्हत्या. तरीही त्याच्या मनावर एक प्रकारचे दडपण येऊ लागले, तेव्हा नाव बदलून घेऊन तो एक सामान्य तरुण बनला.

फिडेलच्या आयुष्यात आलेली आणि जन्मभर त्याची साथी झालेली स्त्री म्हणजे सेलिआ सांचेस, ती देखील ओरिएन्ते प्रांतातीलच. तेथे तिचे वडील एक नामांकित डॉक्टर होते. १९५४ पासून– म्हणजे मोंकाडावरील हल्ल्यानंतरच्या काळापासून तिचा क्रांतिकारक चळवळीशी संबंध होता. मेक्सिकोतील मोहिमेत भाग घेण्यासाठी तेथे जाण्यासही ती उत्सुक होती, परंतु क्यूबात क्रांतिकारक उतरतील त्या वेळेला त्यांना लागणारी साधनसामुग्री गुप्तपणे पुरविण्याची कामगिरी तिच्यावर सोपविण्यात आली होती आणि खरो-खरीच त्या अंधेऱ्या रात्री जीप्स, ट्रक्स, पेट्रोल, खाद्यपदार्थ व औषधे घेऊन ती किनाऱ्यावर हजर होती; परंतु

'ग्रॅन्मा' ठरलेल्या जागेपेक्षा निराळ्या ठिकाणी किनाऱ्याला लागल्यामुळे क्रांतिकारकांना अखेर हालअपेष्टा भोगाव्या लागल्या. सिएरा मेस्त्राच्या संपूर्ण काळात मात्र तिची क्रांतिकारकांना अमोल मदत झाली. देशातील इतर लढवय्यांशी संबंध ठेवणे, संदेश व माणसे नेणे-आणणे ही कामे करता करता अखेरीस ती खांद्यावर बंदूक घेऊन लढणारी गनिमी सैनिक बनली. भूक लागली तरच खायचं आणि थकलं तरच झोपायचं, असं व्रत तिनं सिएरात पाळलं. ती धाडसी, बुद्धिमान, ध्येयवादी, क्रांतिनिष्ठ व फिडेलवर जिवाभावाने प्रेम करणारी विलक्षण स्त्री होती. स्वभावानं स्नेहमय, नीटनेटकी, खूप साधी, पण अत्यंत आकर्षक. फिडेलच्या मनातील विचार कोणाहीपेक्षा तिच्याजवळच अधिक व्यक्त होत असत.

फिडेलने व तिने विवाह केला नव्हता, पण ते एकत्र राहत होते. त्या दोघांबद्दल क्यूबातील लोकांना अमाप कौतुक होते. पुढे क्रांतीच्या विजयानंतर शासकीय व्यवस्थेतही महत्त्वाच्या पदावरची जबाबदारी तिने पार पाडली. १९८० मध्ये तिचे निधन झाले, तेव्हा फिडेलप्रमाणेच सर्व लोकांनाही अतीव दुःख झाले. आजही तिची आठवण मोठ्या प्रेमानं क्यूबातील लोक काढीत असतात.

फिडेलच्या परिवारातील व क्रांतीफौजेतील त्याचा जवळचा स्नेहीसोबती म्हणजे राऊल कॅस्ट्रो. हा त्याच्याहून चार वर्षांनी लहान असलेला भाऊ. फिडेलच्या घरातील इतर सर्व मंडळी त्याच्या बंडखोरीच्या उपक्रमाच्या विरोधात होती; तेव्हापासूनच तो फिडेलचा सहकारी आहे.

क्यूबाच्या कम्युनिस्ट पक्षाच्या पहिल्या परिषदेत (१९७५ मध्ये) मध्यवर्ती समितीची निवड जाहीर करताना फिडेलने चिटणीसमंडळाची ओळख करून देताना राऊलचा खास उल्लेख केला आणि म्हटले,

" दुसरा सेक्रेटरी म्हणून पक्षाने अशा एका कॉम्रेडची निवड केली आहे, की जो गुणवत्ता, कुवत व पात्रता या सर्व दृष्टींनी या पदासाठी पूर्णपणे लायक आहे. आपल्या पक्षातही काही सभासद कौटुंबिक नाते असलेले आहेत; आपण त्यांच्या कृतींवरून त्यांची पारख करतो; नाती अगर मैत्री यांना पक्षात निर्णायक स्थान बिलकूल नाही.

" या कॉम्रेडबद्दल, कॉ. राऊलबद्दल मी इतकेच म्हणेन की अशा उत्कृष्ट क्रांतिकारकाचा मी भाऊ आहे, याचा मला अभिमान वाटतो. क्रांतीच्या प्रारंभापासून तो तिच्यात सहभागी आहे. आम्ही दोघांनीही मोंकाडा शस्त्रागारावरील हल्ल्यात भाग घेतला. त्या वेळी राऊलने जी कामगिरी बजावली ती पार पाडली नसती तर त्याच्यासह सर्वजण – जे बचावले ते– मृत्युमुखी पडले असते. त्यानंतर तुरुंगवास, हद्दपारी, ग्रॅन्मा मोहीम आणि सिएरा मेस्त्रातील हालअपेष्टा आणि अखेरची झुंज व विजय या सर्वांत राऊलचा पुढाकार होता."

राऊलची ओळख क्यूबातील लोकांना वास्तविक फिडेलने करून देण्याची आवश्यकता नव्हती, परंतु परदेशांतील लोकांना फिडेलने मुद्दाम दिलेले हे स्पष्टीकरण आहे.

फिडेलच्या गटापैकी राऊल हाच तरुण कम्युनिस्ट संघात काही काळ कार्य केलेला आहे. १९५३ मध्ये विद्यार्थी असताना तो व्हिएन्नातील युवक परिषदेतही प्रतिनिधी म्हणून उपस्थित होता. त्यावेळी तो पोलंड, हंगेरी या देशांनाही भेटी देऊन आला होता. १९५४-५५ मध्ये आइल ऑफ पाईन्सच्या तुरुंगात त्याने मार्क्स व लेनिनचे काही लिखाणही वाचले होते. त्याचा कल कम्युनिस्ट विचारसरणीकडे प्रथमपासूनच फिडेलपेक्षा अधिक होता.

आणि क्रांतीच्या विजयानंतर अमेरिकन साम्राज्यवाद्यांच्या शत्रुत्वाने व आर्थिक कोंडीने हैराण झाल्यानंतर सोविएत युनियनबरोबर संबंध प्रस्थापित करण्याचे काम मुख्यतः त्याच्याचकडे आले. १९६२ मध्ये त्याने मॉस्कोचा दौरा केला आणि क्यूबाच्या स्वातंत्र्याच्या व सार्वभौमत्वाच्या रक्षणासाठी तेथील नेत्यांबरोबर बोलणी केली. त्यानंतरचा इतिहास आपण आधीच माहीत करून घेतला आहे.

सध्या राऊल कॅस्ट्रो क्यूबाच्या कम्युनिस्ट पक्षाचा दुसरा चिटणीस आहे, त्याचप्रमाणे लष्करप्रमुख (आर्मी जनरल) ही आहे.

राऊलसारखेच फिडेलचे आणखी कितीतरी जिवाभावाचे दोस्त आहेत. त्यांनी त्याला सशस्त्र लढ्यात त्याचप्रमाणे आर्थिक पुनर्रचनेच्या लढ्यात सदैव साथ दिली आहे. त्या सर्वांच्या जीवनकथा अत्यंत रोमांचकारी व स्फूर्तिदायक आहेत. परंतु या पुस्तकाची पृष्ठमर्यादा लक्षात घेऊन आपण फिडेलच्या फक्त आणखी एका मित्राचाच परिचय करून घेणार आहोत. तो आहे अर्नेस्टो चे गव्हेरा. सर्वत्र तो 'चे' या नावानेच प्रख्यात आहे.

क्यूबाच्या स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास पाहताना आपली 'चे' बरोबर अनेकदा भेट झाली आहे. ग्रॅन्माच्या मोहिमेपासून हवानात स्वतंत्र क्यूबाचे सरकार स्थापन होईपर्यंत त्याने बजावलेली कामगिरी आपण थोडक्यात माहीत करून घेतलीच आहे. क्यूबाच्या समाजवादी रचनाकार्यातही त्याने फार मोलाची कार्ये केली. प्रथम त्याच्यावर क्यूबाच्या राष्ट्रीय बँकेच्या अध्यक्षपदाची, नंतर उद्योगमंत्रिपदाची व पुढे नियोजन मंडळाच्या प्रमुख सदस्यपदाची जबाबदारी आली आणि ती त्याने अत्यंत समर्थपणे पार पाडली. क्यूबात 'समाजवादी श्रमिक चढाओढ' सुरू करण्याचा मानही त्यालाच द्यावा लागतो.

क्यूबन क्रांतीनंतर थोड्याच महिन्यांनी (१९५९ च्या सप्टेंबरमध्ये) त्याने इजिप्त, सुदान, पाकिस्तान, भारत, ब्रह्मदेश, इंडोनेशिया, श्रीलंका, जपान, मोरक्को, युगोस्लाव्हिया व स्पेन या देशांचा दौरा केला आणि क्यूबातील परिस्थिती व समस्या यांची या देशांना माहिती दिली.

१९६० च्या नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये त्याने प्रथमच समाजवादी देशांना भेटी दिल्या. क्यूबाच्या आर्थिक शिष्टमंडळाचा नेता म्हणून तो सोविएत युनियन, झेकोस्लोवाकिया, पूर्व जर्मनी, चीन व उत्तर कोरिया या राष्ट्रांत गेला आणि क्यूबाची अमेरिकेने केलेली आर्थिक कोंडी फोडण्याचा मार्ग सापडला, या आनंदात क्यूबात परत आला.

१९६१ मध्ये अमेरिकेने आक्रमण केले तेव्हा त्याने पुन्हा बंदूक खांद्यावर घेऊन सैन्याचे नेतृत्व केले. १९६२ मध्ये 'चे'ने सोविएत युनियनला भेट दिली आणि क्यूबाच्या स्वातंत्र्यरक्षणासाठी शस्त्रास्त्रे मिळविण्यासंबंधी वाटाघाटी केल्या. त्यातून जगाला हादरविणारी परिस्थिती कशी निर्माण झाली, ते आपण पूर्वी पाहिलेच आहे.

यानंतरच्या काळात त्याने आफ्रिकेतील माली, कांगो, गायना, घाना, दाहोमी, तान्झानिया, तसेच इजिप्त, अल्जेरिया इत्यादि देशांना आफ्रो-एशियन एकता संघटनेच्या आर्थिक कार्यक्रमांच्या चर्चांच्या निमित्ताने भेटी दिल्या. त्यासंबंधीचा अहवाल त्याने १५ मार्च १९६५ रोजी उद्योगमंत्रालयाच्या कर्मचाऱ्यांना विस्तृतपणे दिला. हे त्याचे क्यूबातील अखेरचे सार्वजनिक दर्शन. त्यानंतर 'चे दिसेनासा झाला—क्यूबातून अदृश्य झाला—' अशा बातम्या जगभर पसरल्या.

क्यूबाची प्रगती चालू झाली; पण दक्षिण अमेरिकेतील इतर देश मात्र अद्याप मुक्त झालेले नाहीत,

याचे 'चे'ला अत्यंत दुःख होते. त्याचा क्रांतिकारक बाणा त्याला स्वस्थ बसू देईना. क्यूबातील लोकप्रियता, यशस्वी जीवन, संसार सर्व सोडून चे पुन्हा क्रांतिसंग्रामासाठी सज्ज झाला.

क्यूबाच्या धर्तीची क्रांती बोलेव्हियामध्ये करता येईल, असा त्याने निष्कर्ष काढला होता आणि त्या दृष्टीने तयारीही सुरू केली. पेरू, अर्जेंटिना व बोलेव्हिया यांच्या सरहद्दी एकमेकांना लागून असल्यामुळे झालेल्या त्रिकोणाचा फायदा मिळून बोलेव्हियाला या दोन देशांतील क्रांतिकारकांचीही मदत मिळेल असा चेने अंदाज बांधला.

अशी जागा त्यांनी आग्नेय भागातील जंगलात कॅलामिना गांच ही निवडली. तिथे जवळपास पाणी नव्हते आणि विषारी जीवजंतूंचा सुळसुळाट होता. वेशांतर करून चे बोलेव्हियात शिरला आणि १९६६ च्या नोव्हेंबरच्या ७ तारखेला छावणीवर जाऊन पोहोचला. त्याच्या पहिल्या सहकाऱ्यांत १७ क्यूबन क्रांतिकारक होते. प्रत्यक्ष लढाईला प्रारंभ झाला तेव्हा तेथे ४७ लढवय्ये होते. त्यातील काही पेरूतील व काही बोलेव्हियन होते. बोलेव्हियातील या जंगली प्रदेशात चेने ११ महिने लढा दिला. त्यातील प्रत्येक दिवसाची नोंद त्याने केली—ही बोलेव्हियन रोजनिशी त्याने मृत्यू समोर दिसू लागला असताही, मरणाच्या आदल्या दिवसापर्यंत लिहिली. ती वाचून सगळे जग आश्चर्याने व आदराने केवळ थक्क झाले.

चे बोलेव्हियात आल्याची बातमी अमेरिकेच्या गुप्तहेर खात्याने बोलेव्हियाच्या सरकारला आधीच दिली होती. चेच्या गनिमी सैनिकांना शहरातील कामगारांचा पाठिंबा मिळू नये म्हणून सरकारने सर्व कामगार लढे दडपून काढण्यास प्रारंभ केला. संपावरील खाण कामगारांवर गोळीबार करून ८० कामगारांना ठार मारले.

इकडं गनिमांना अन्नपाणी व शस्त्रास्त्रं मिळू नयेत, तसेच इतर नवीन लोक सामील होऊ नयेत म्हणून अमेरिकन युद्धतज्ज्ञांनी शिकवून तयार केलेले सैन्य संपूर्ण प्रदेशात विखरून ठेवलं. त्यांनी आजूबाजूच्या प्रदेशातील शेतकऱ्यांवर दहशत बसविली आणि चेच्या लढवय्यांना अलग पाडण्यात यश मिळविलं. भोवतालचा सर्व प्रदेश सरकारच्या लष्कराच्या ताब्यात होता; तरी 'चे' चे क्रांतिकारक लहानमोठ्या लढाया जिंकून आगेकूच करीत होते.

चेच्या तीन अलग अलग गनिमी सैन्य तुकड्या कोंडीतून बाहेर पडण्यासाठी वाटा धुंडीत होत्या. त्यातील दोन तुकड्यांची कत्तल करून सैनिकांनी चेच्या तुकडीवर मोर्चे बांधले. वेढले गेलेल्या क्रांतिकारकांनी मृत्यू येईपर्यंत झुंज दिली. चेला व त्याच्या दोघा साथीदारांना लष्करी सैनिकांनी पकडले आणि एका झोपडीत कोंडून ठेवलं. नंतर चेच्या दोघा मित्रांना गोळ्या घातल्या आणि नंतर चेलाही ठार केले.

अशा रीतीने 'चे'चा खून केल्यानंतर, ती झोपडी 'चे'चे स्मारकस्थान होईल या भीतीने जाळून टाकली आणि हेलिकॉप्टरमधून 'चे'चे प्रेत व्हॅले ग्रांडे शहरात नण्यात आले; त्याला खरंच मारलं हे 'चे'कडे डोळे लावून बसलेल्या सर्व देशातील क्रांतिकारकांना दाखविता यावे म्हणून त्याचे हात तोडून ते रसायनात जसेच्या तसे राहतील अशी व्यवस्था करण्यात आली. चेच्या अमानुष खुनाची बातमी सर्वत्र पसरली आणि जगभर त्याच्या शौर्याच्या कथा प्रसिद्ध झाल्या. ही दुःखद घटना ९ ऑक्टोबरला घडली. १८ ऑक्टोबरला हवाना येथे प्रचंड शोकसभा झाली. दुःखाचे, संतापाचे व क्रांतीनिष्ठेचं एवढं मोठं निदर्शन क्यूबाच्या संपूर्ण क्रांतीच्या इतिहासात अद्वितीय होते. फिडेल कॅस्ट्रोने तेव्हा केलेलं भाषण अविस्मरणीय असे झाले.

चे अनेक दृष्टीने अविस्मरणीयच आहे. तो अत्यंत बुद्धिमान तर होताच; पण वैद्यकीहतक्याच सहजतेने तो लेखणी चालवीत असे. त्याने शेकडो लेख लिहिले. बोलेव्हियातील जंगलातून त्याने लिहिलेला 'दोन तीन व्हिएतनाम निर्माण करा' हा लेख वाचून व्हिएतनाममध्ये हार खात असलेले अमेरिकन शासनाधिकारी चक्रावून गेले होते. सिएरा मेस्त्राच्या अनुभवावर त्याने लिहिलेले व १९६० मध्ये प्रसिद्ध झालेले 'गनिमी युद्धशास्त्र' हे पुस्तक लॅटिन अमेरिकेतील लढवय्यांना सतत स्फूर्तिदायक वाटत होते. मृत्यूच्या थोडे दिवस आधीपर्यंत तो त्याच्या आईवडिलांना खुशालीची पत्रे पाठवीत होता, ती अत्यंत मिस्किल विनोदाने भरलेली आहेत. आपल्या मुलांना या युद्धछावण्यांतूनही त्याने पत्रे लिहिली, त्यात "चांगला अभ्यास करा आणि चांगले क्रांतिकारक व्हा. जगात जेथे अन्याय असेल तेथे धावून जा," असा उपदेश केला आहे. 'चेची पत्रे' हा साहित्यातील एक अनमोल ठेवा आहे.

फिडेल कॅस्ट्रो 'चे' बद्दल म्हणतो, "चे सारखा एकच माणूस होता आणि तो म्हणजे चे!"

अशी आहेत ही क्यूबाची क्रांतिकारक माणसे–फिडेल कॅस्ट्रो आणि त्याचे सहकारी. त्यांच्यासारखे व्हायला कोणाला आवडणार नाही?

सोविएत बालवाङ्‌मय

१.	चतुर कोंबडा	२–००	७.	लेनिनच्या बालकथा	१–००
२.	कणीस	१–५०	८.	प[illegible]ाळांच्या गमती	२–५०
३.	मित्रमंडळी	४–५०	९.	[illegible]तला कुत्रा	२–५०
४.	लोकांनी पृथ्वीचा आकार कसा शोधला	१०–००	१०.	विस्कटलेला चिमणा	३–००
५.	शूर मुंगळा	३–००	११.	दुर्बिणीची गोष्ट	९–८०
६.	ऑक्टोबरचे पहिले दिवस	१–००	१२.	माणूस महाबलाढ्य कसा बनला	१७–००

द. शि. टकले।
डॉ. हाफकिन
मायकेल फॅरडे
गॅलिलिओ
चार्लस डार्विन
जगदीशचंद्र बोस
आयझॅक न्यूटन

सरला कारखानीस।
कार्ल मार्क्स

शिवराम आवटे।
गागारिनचा अंतराळ प्रवास

लीला आवटे।
महर्षी अण्णा कर्वे
डॉ. रामन

पुष्पा जोशी।
आईन्स्टाईन

मृण्मयी बारपांडे।
मादाम क्युरी
एडिसन

सुधा कुळकर्णी।
शरच्चंद्र

दिवाकर बापट
निल्स बोर
रामानुजम
रवीन्द्रनाथ टागोर
मार्टिन ल्यूथर किंग
इवान पावलोव्ह
ईश्वरचंद्र विद्यासागर
कर्मवीर भाऊराव पाटील

वीणा कऱ्हाडे।
पंडिता रमाबाई

लोकवाङ्मय गृह लि., ८५, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.